पुणे, किशोर– वर्ष ५३, अंक २ रा, फेब्रुवारी २०२४, (मासिक)– किंमत रु. ७/– पृष्ठे– ५२
Pune, Kishor- Vol. 53, Issue- 2, February 2024 (Monthly)- Price Rs. 7/- Pages- 52

# किशोर

फेब्रुवारी २०२४





# माय मराठी

■ शंकर विटणकर

माझ्या माय मराठीची
आहे आगळी कहाणी
वाजे स्वर्गीय संगीत
तिचे बोल येता कानी

कुठे वैदर्भी कोंकणी
कुठे अहिराणी धूम
मन हरखून जाई
तिच्या गोष्टींत रमून

गावा–शिवारांमधल्या
लोकांची बोली ऐकून
पाखरेही गाती पाहा
तिचे माधुर्य प्राशून

ज्ञानदेवाच्या ओव्यांना
तिने दिले अमरत्व
थोर संतांच्या काव्यात
तिचे कळू येई स्वत्व

शिवरायांच्या खड्गात
तीच होती खणाणली
मग लावण्या–पोवाडे
होऊनिया निनादली

सर्व जातिधर्मीयांना
प्रेमे पोसते माऊली
तिच्या पदरी सर्वांस
मिळे मायेची सावली

नव्या कवी–लेखकांही
लाभे तिचीच पुण्याई
तिच्या ऋणातून वाटे
होऊ नये उतराई

आम्हां मराठी जनांची
तीच देवरूपी माय
दूध अमृताचे पाजी
आम्हां वासरांची गाय



संपर्क ९८६००२४६२९

**किशोर** फेब्रुवारी २०२४, वर्ष ५३ वे, अंक २ रा, पौष-माघ शके १९४५

**संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

निर्मिती अधिकारी : हेमंत बाबर

अक्षरजुळणी : किशोर विभाग

**कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

वितरण व्यवस्थापक
जालिंदर पाटील

मुखपृष्ठ : अरुण सुतार, ९४२०६७५२०८
साभार : अमृत पुरंदरे

चित्रांकन : *घनश्याम देशमुख, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, बुध्दभूषण लोंढे, योगिता धोटे, अमृता ढगे, माईंडइंट संवाद*

## अंतरंग


- मायमराठी ........ *शंकर विटणकर* ........ ०२
- एका लढाईची गोष्ट ........ *प्रा. डॉ. गणेश राऊत* ........ ०६
- चला चित्र रंगवूया...!!! ........ *धनश्री केळकर* ........ १०
- गंमत जंमत ........ *प्रा. रामदास केदार* ........ ११
- ढोलूरामने चाखले चुलीवरचे आईसक्रीम ........ *मुकुंद टाकसाळे* ........ १२
- चिन्हांचा कलह ........ *प्रा. चंद्रसेन टिळेकर* ........ १५
- 'दिनुला भेटली मराठी!' ........ *दीपाली चरेगांवकर* ........ १६
- कुतूहल जागृती ........ *पंडित विद्यासागर* ........ २०
- मोबाईल ........ *लक्ष्मण शिंदे* ........ २३
- बोलणारं रताळं ........ *चेयेन रंदाल* ........ २४
- गंमत कोडी ........ *घनश्याम देशमुख* ........ २६
- लिहावे कसे? ........ *कृष्णा खंडू कुदळे* ........ २७
- सुट्टी रे सुट्टी... शब्दांशी गट्टी ........ *डॉ. वर्षा तोडमल* ........ २८
- विद्यार्थी हिताच्या विविध शासकीय योजना ........ ३१
- मात्यांच्या माहित्या??!! ........ *जयश्री काटीकर* ........ ३२
- परिंदे की फ़रियाद ........ *प्रदीप निफाडकर* ........ ३६
- कुतूहल ........ *अमित डहाणे* ........ ३८

**बालविभाग**
- भावी आधारस्तंभ ........ ४०
- उमलती प्रतिभा ........ ४२
- चित्रकथा : पाठलाग ........ *घनश्याम देशमुख* ........ ४४
- कामसू परी! ........ *शशिकांत काळे* ........ ४६

**ENGLISH SECTION**
- The Nature ........ *Ananya Mahamuni* ........ ४७
- Memorable time ........ *Atul Shirude* ........ ४८
- Funny Puzzle ........ *Ghanshyam Deshmukh* ........ ५०


ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४, संपादकीय : ०२०- २५७१६१०७, वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४, ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

आज कित्येक दिवसांनी घरी आल्यानंतर सहज किशोरचा अंक वाचला, वाचल्यानंतर कित्येक जुन्या आठवणी जाग्या झाल्या. खरंच किशोरने माझे बालपण समृद्ध केले होते. किशोर दिवाळी अंकाची बघितलेली वाट मला अजून आठवतेय. किशोरनेच तर मला वाचनाची गोडी लावली होती.

आता मी मोठा झालो. आजकाल किशोर वाचत नाही, पण मी नक्की माझ्या भाच्यांसाठी अंक मागवयाला सुरुवात करेन. धन्यवाद किशोर, माझे बालपण सुरेख केल्याबद्दल. हा उपक्रम असाच सुरू ठेवा. माझ्या खूप खूप शुभेच्छा.

**आदित्य धुमाळ**
श्रीकृष्ण निवास, तिरंगा नगर,
लिंक रोड, पंढरपूर, जिल्हा- सोलापूर ४१३३०४

आमच्या शाळेत किशोर मासिकाचे अंक येतात. मुले नियमितपणे किशोरचे वाचन करतात. मुलांना किशोर अंक खूप आवडतो. किशोर मासिकामुळे त्यांना अवांतर वाचनाची गोडी लागली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, भूगोल, इतिहास, सामान्य ज्ञान, इंग्रजी व मराठी शब्दकोडी यांमुळे मुलांना अभ्यासक्रमाबाहेरचे ज्ञान मिळते. या मासिकातून भाषा, साहित्य आणि वाचनाचे चांगले संस्कार मुलांवर होतात. किशोरने उमलती प्रतिभा आणि भावी आधारस्तंभ या सदरांमधून मुलांना लिहिते केले आहे.

**समाधान शिकेतोड**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राघुची वाडी.
तालुका व जिल्हा धाराशिव -४१३५०१








हितगुज

# कोषातून बाहेर पडण्यासाठी कोश वाचा...

गंमत आहे ना ! की, सर्व प्राण्यांमध्ये एकमेव माणूस हा प्राणी विचार करू शकतो, बोलू शकतो, लिहू शकतो. इतर प्राण्यांचा विचार करता माणसापाशी एक मोठी शक्तीदेखील आहे आणि त्या शक्तीचे नाव आहे शब्दशक्ती. ही शब्दशक्ती त्याला भाषेतून मिळते. कोणत्याही भाषेची गंमत, गोडी आणि तिचे सामर्थ्य हे तिच्या शब्दांत असते. प्रत्येक भाषेतील शब्दाला स्वतःचा नाद, गंध, रंग, रस, स्पर्श असतो. शब्दांचे महत्त्व खूप मोठे आहे.संत तुकोबा म्हणतात, 'आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शस्त्रे यत्न करू।। शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन। शब्दे वाटू धन जनलोका ।। तुका म्हणे पहा शब्दचि हा देव। शब्देचि गौरव पूजा करू।।' पहा ना, इतक्या थोडक्या शब्दांत किती मोठा अर्थ तुकोबा आपल्याला सांगतात ना!

प्रत्येक भाषेतील शब्दांना अर्थ असतात. अनेकदा एकाच शब्दाला अनेक अर्थही असतात. त्यामुळे लिहिताना, बोलताना आणि वाचतानासुद्धा शब्दाचा योग्य अर्थ माहीत असणे आवश्यक असते. आपण व्यक्त होण्यासाठी शब्द कसा, कधी वापरावा यावर त्याचे सर्व सामर्थ्य अवलंबून आहे. नाहीतर मग भलामोठ्ठा गोंधळ होतो. एकाच शब्दाचे अनेक अर्थ आपल्याला माहीत असतीलच असे नाही किंवा माहीत असले तरी आपण हे शब्द नेमके कुठे, कधी, कसे वापरायचे हे ठाऊक नसते! म्हणूनच आपल्या भाषेतील शब्दांचे अर्थ, अर्थच्छटा आपण माहीत करून घ्यायला हव्यात. याकरिताच विविध शब्दांचे अर्थ, त्यांच्या अर्थच्छटा यांची माहिती सांगणाऱ्या विविध शब्दकोशांची (Dictionary) निर्मिती झाली. शब्दकोश म्हणजे एखाद्या भाषेतील वापरत असलेल्या तसेच वापरातून गेलेल्या अशा यच्चयावत शब्दांचा त्यांच्या अर्थासहित ज्यात संग्रह केलेला असतो असा संदर्भग्रंथ. आता या व्याख्येतील यच्चयावत याच शब्दाबद्दल पहा ना ! यच्चयावत म्हणजे काय हो? नाही माहीत? अहो यच्चयावत म्हणजे सर्व; एकही न वळगता; शिल्लक न ठेवता. तर शब्दकोशात अशा यच्चयावत शब्दांच्या अर्थासोबतच सामान्यतः शब्द, त्याची व्युत्पत्ती, (म्हणजे एखाद्या शब्दाचे मूळ रूप, त्याचा इतिहास, अन्य भाषांत तो शब्द कसा आला आहे याची माहिती. आणि बरं का, याचाही एक स्वतंत्र कोश असतो त्याला व्युत्पत्तीकोश असे म्हणतात) त्यात शब्दाचे व्याकरण, वाक्संप्रदाय, म्हणी आदी घटक दिलेले असतात. काही शब्दकोशांमध्ये चित्रेही दिलेली असतात; तर काही शब्दकोशांमध्ये त्या त्या शब्दाचा उच्चारदेखील दिला जातो. एकप्रकारे शब्दांचा घेतलेला धांडोळा आणि मागोवा म्हणजे शब्दकोश.

मूळ शब्दांचा अर्थ समजावा आणि जिज्ञासूची (म्हणजे ज्ञान मिळवण्याची इच्छा असणारा /असणारी व्यक्ती) शब्दशक्ती वाढावी, हा महत्त्वाचा हेतू शब्दकोश निर्मितीमागे असतो. माणसाच्या रोजच्या जगण्यातून, व्यवहारातून, व्यापारातून जसजशी भाषा वाढू लागते तसतसा शब्दांचा संग्रह वाढायला सुरुवात होते. भाषांच्या आदानप्रदानातून देखील तो वाढतो. कारण भाषा ही नदीसारखी प्रवाही असते. यातूनच या विविध शब्दांची एकाच ठिकाणी साठवणूक करणे आणि या शब्दसंग्रहातील विविध शब्दांचा अर्थ सांगणे या गरजेतून शब्दकोशाची निर्मिती होते. त्याचप्रमाणे शब्दकोश अद्ययावत करण्याची (म्हणजे सुधारण्याची) तसेच नवा शब्दकोश तयार करण्याचीही आवश्यकता असते.

मोल्सवर्थ, कँडी, राजवाडे, केतकर, दाते, कर्वे अशा अनेक थोर लोकांनी मराठी शब्दकोशांची निर्मिती करून आपली भाषा समृद्ध केली आहे. यातील कँडीने तर मराठीत विरामचिन्हे आणली. ज्ञानकोश,विश्वकोश, भारतीय संस्कृतिकोश,तत्त्वज्ञान कोश, चरित्र कोश, समाज विज्ञान कोश, विविध ज्ञानशाखीय शब्दकोश, व्यवसायानुसार तयार करण्यात आलेले शब्दकोश, परिभाषिक शब्दकोश, सर्वसमावेशक किंवा बृहद-शब्दकोश, विशिष्ट शाखीय शब्दकोश, विशिष्ट भाषाभेदांचे शब्दकोश, समानार्थी तसेच विरुद्धार्थी शब्द देणारे कोश, म्हणी व वाक्संप्रदाय कोश, उच्चार कोश, लोकसाहित्य कोश, मराठी –इंग्रजी किंवा इंग्रजी – मराठी शब्दकोश, मराठी – सिंधी शब्दकोश या प्रकारचे अनेक द्विभाषिक व बहुभाषिक शब्दकोश असे शब्दकोशांचे विविध प्रकार आहेत. या प्रकारचे अनेकाविध कोश तसेच तुम्हां विद्यार्थ्यांसाठी खास तयार करण्यात आलेले शालेय मराठी शब्दकोश, कुमार विश्वकोश,मुलांचा संस्कृतिकोश हे तुमच्या शाळेच्या किंवा जवळच्या ग्रंथालयात जाऊन नक्की पहा. शब्दकोश उघडल्यावर आतील पानात तो कसा वाचायचा याबद्दल मार्गदर्शनपर सूचना जरूर वाचा. एकाच वेळी ज्ञान आणि मनोरंजन देणाऱ्या या कोशांशी तुम्ही मैत्री करा. हे सर्वच शब्दकोश आपल्या सभोवताली असलेल्या असंख्य शब्दांची शब्दसृष्टी उलगडून दाखवत आपल्याला त्यांच्या सुंदर, जादुई दुनियेत घेऊन जातात. शब्दांचा अफाट खजिना तुमच्यासमोर खुला करतात. तुम्हांला शब्दसंपत्ती प्रदान करतात. त्यात दिलेल्या एका शब्दातून दुसऱ्या व त्यापुढील शब्दांची सफर घडवून आणतात. शब्दकोशात बुडी घेत सुरू झालेला वाचनप्रवास तुम्हांला निःसंशय समृद्ध करत जाईल हे नक्की. आता 'निःसंशय' या शब्दाचा अर्थ तुम्ही शब्दकोशात पहा बरं !

– किरण केंद्रे
कार्यकारी संपादक

प्रा. डॉ. गणेश राऊत

# एका लढाईची गोष्ट



मराठीचा तास सुरू होता. इतक्यात वर्गावर मुख्याध्यापकांची सूचना वही आली. 'पुढील तासाच्या गणिताच्या शिक्षिका येणार नाहीत, म्हणून पुढचा तास घ्या.' मजकूर वाचला आणि शिक्षकांनी पुन्हा शिकवायला सुरुवात केली. एवढ्यात तास संपण्याची घंटा झाली. नेहमी गणिताच्या शिक्षिका अगोदरच वर्गाच्या दरवाजापाशी येऊन उभ्या राहायच्या. आज त्या दिसल्या नाहीत, त्यामुळे वर्गातली मुले खट्टू झाली. त्यांना गणिताचा तास फार आवडायचा. गणिताच्या बाई विद्यार्थ्यांच्या आवडत्या शिक्षिका होत्या.

तास संपल्याच्या घंटेचा आवाज मुलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि गणिताच्या बाई न आल्याची निराशा एकाच वेळी दाखवत होता. ते सरांच्या लक्षात आले. हातातलं मराठी व्याकरणाचं पुस्तक त्यांनी बाजूला ठेवले आणि ते म्हणाले,

"तुम्हांला गोष्ट ऐकायला आवडेल का?" मुलं एका सुरात ओरडली. "हो, हो, हो."

"अरे मुख्याध्यापकांच्या खोलीत आवाज नको जायला." सर ओरडले. एक जरा जास्तच हुशार विद्यार्थी म्हणाला, "आम्ही तर तुमच्याकडून कधीच गोष्ट ऐकली नाही."

सर म्हणाले, "आता ऐका, पण मी एकाच अटीवर गोष्ट सांगणार आहे."

मुलं ओरडली– "कोणती अट?"

"या वेळी गोष्ट मी सांगणार; पुढच्या वेळी तुम्ही गोष्ट सांगायची". सर म्हणाले.

पोरं तालासुरात ओरडली– "मान्य."

सर म्हणाले की, "चटकन आपण तीनशे चोपन्न वर्ष मागं जाऊया."

मुलं एकदम ओरडली– "गेलो" सर हसले. सरांनी वर्गावरून एक नजर फिरवली. सगळा वर्ग शांत झाला. त्यांनी गोष्ट सांगायला सुरुवात केली.

"इसवी सन १६७०. स्थळ राजगड, शिवराय आपल्या विश्वसनीय सल्लागारांसोबत खलबते करत बसलेले होते. मिर्झा राजा जयसिंगाच्या स्वारीचा खर्च कसा भरून काढायचा हाच विचार प्रत्येकाच्या मनात होता. मागचा सगळा खर्च भरून काढण्याची कुवत असलेले एकमेव ठिकाण म्हणजे सुरत. हेरांनी बातमी आणली. सुरतच्या दिशेने महाराजांच्या तलवारीचे पाते चमकले. सुरतेवर स्वारी करायच्या कल्पनेनेच मराठ्यांच्या अंगावर मूठभर मांस चढले. या वेळेला मुघलांच्या वतीने दक्षिण सुभ्यावर असणारा दिलेरखान आणि औरंगजेब पुत्र शहजादा मुअज्जम यांच्यात तीव्र संघर्ष चालू होता. दोघांचे भांडण आणि तिसऱ्याचा लाभ. महाराजांच्या आदेशानुसार कल्याणच्या भागात पंधरा हजार फौज उभी राहिली. त्याच वेळी आता सात समुद्र पारहून आलेल्या गोऱ्या तोंडाच्या......

सदा म्हणाला. "अहो सर, सर, इंग्रज ना?"

"अरे, हो, हो, मी तेच सांगतोय." सर म्हणाले.

"इंग्रजांनी मराठ्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवले होते. त्यांनी आपली हेर यंत्रणा सुसज्ज ठेवली होती. कल्याणमध्ये पंधरा हजार सैन्य जमताच त्यांनी सुरतच्या इंग्रजांना बातमी दिली की, कदाचित सुरतेवरच स्वारी होणार. इंग्रज संभाव्य धोका ओळखून लगेच कामाला लागले. इंग्रजांनी "शत्रूचा शत्रू तो आपला मित्र" या नात्याने बातमी सुरत येथील मुघल सुभेदाराकडे पाठवली. सुरत शहराचा मुघल सुभेदार अतिबलाढ्य फौजेनिशी सुरत शहरात मुक्कामास होता. आपल्या प्रचंड

फौजेचा दरारा त्याने सर्वत्र पसरवला होता. पहिली सुरत स्वारी झाल्यावर मराठ्यांनी या बलाढ्य सरदारामुळे गेल्या सहा वर्षांत सुरतेवर स्वारी केली नव्हती. त्या बलाढ्य सरदाराकडे सैन्य होते, तीनशे. गेली सहा वर्षे हा सरदार मराठे येणार, येणार, नक्की येणार, असे ऐकत होता. गेल्या दोन हजार दिवसांत कधीच मराठ्यांचे आक्रमण झाले नाही. त्यामुळे तो बेसावध होता. महाराज कल्याण, भिवंडी, मनोर, तलासरी, पारडी, बलसाड, गणदेवी, नवसारी मार्गे सुरतेस पोहोचले असण्याची शक्यता आहे. मी काही इतिहास-भूगोलाचा शिक्षक नाही. माझ्यापेक्षा इतिहासाच्या सरांकडे वेगळी माहिती असू शकते."

सदा ओरडला, "अहो सर, पुढे काय झालं ते सांगा ना."

"बरं, बरं." सर म्हणाले आणि गोष्टीची गाडी रुळावर आली. "महाराजांच्या स्वारीची बातमी अगोदरच मिळाल्यामुळे इंग्रज, डच, फ्रेंच तयारीत होते. इंग्रजांच्या वखारीचा प्रमुख स्ट्रेनशाम मास्टर लढाईच्या तयारीत होता. सुरतेची स्वारी तीन दिवस सुरू होती. मराठ्यांना अमाप संपत्ती मिळाली. बखरी आणि मुघल दरबारची बातमीपत्रे यातील आकडा पाच कोटी ते कमीत कमी ५३ लक्ष असा आहे. सत्य दोघांच्या मध्ये असणार. हा सगळा खजिना घेऊन महाराज स्वराज्याकडे निघाले. सुरतेतून पेठ-बागलाण या नाशिक भागातून परत फिरायचे ठरले. ज्या मार्गाने आले होते, त्याच मार्गाने परत जायचे नव्हते. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे मराठे वेगाने आले होते. परतताना संपत्तीच्या ओझ्यामुळे वेग मंदावला. सुरतेवरील स्वारीची बातमी औरंगजेब पुत्र शहजादा मुअज्जम याला समजली. त्याने 'तुम लढो, हम कपडे संभालते है' अशी वृत्ती ठेवून बऱ्हाणपूरचा मुघल सरदार दाऊदखान कुरेशी याला मराठ्यांच्या मागावरच पाठवले. दाऊदखान हुशार होता. मराठे साल्हेर- मुल्हेर, चांदवड, कंचन -मंचन घाटाने उतरणार अशी त्याला खात्री होती. त्याने चांदवड परिसरात महाराजांना घेरण्यासाठी वाकेखान सरदार पाठवला. मराठ्यांनी त्याला पळवून लावले. वाकेखान पराभूत झाला तरी दाऊदखान हरला नव्हता. त्यातही हुशारीने रात्रीचा पाठलाग सुरू ठेवून चांदवड येथे त्याने आपला सरदार इखलासखान यास पुढे पाठवले. इखलासखान आपल्या सर्वोत्तम फौजेसह मराठ्यांना सामोरा गेला. आपल्यासमोर काय वाढून ठेवले आहे हे त्याला माहीतच नव्हते. मराठ्यांची दहा हजार फौज आपल्यासमोर उभी पाहून खानाच्या पायाखालची वाळू सरकली. त्याला आश्चर्य वाटले. पंधरा हजारांची फौज घेऊन महाराज सुरतेवर स्वारी करायला आले होते. उरलेले पाच हजार कोठे गेले? मुघल पाठलाग करणार याची खात्री असल्याने महाराजांनी पाच हजार मावळे सगळ्या संपत्तीसह पुढे पाठवून दिले होते. दहा हजारांची सडे फौज घेऊन महाराज तटबंदीसारखे मुघलांसमोर उभे ठाकले. इखलासखान भाग्यवान खरा ! त्याला महाराज दिसले. तो महाराजांशी प्रत्यक्ष लढला. तलवार, भाले, खंजीर यांची एकदमच गर्दी उडाली आणि युद्धात खान कोसळला. मुघलांचे नशीब जोरदार होते. खान पडला तरी मुघलांच्या मदतीला दाऊदखान कुरेशी आला. मुघलांची अवस्था 'एक डोळा मागावा, दोन डोळे मिळावे' अशी झाली. त्याने दोन सरदार

मराठ्यांविरुद्ध पाठवले. दाऊदखान स्वतः नेतृत्व करू लागला. पाच तास भीषण असा रणसंग्राम झाला. दोन्ही पक्ष रक्तात न्हाऊन निघाले. विजयश्रीने मराठ्यांच्या गळ्यात माळ घातली. किंबहुना शिवरायांनी विजयश्री खेचूनच आणली. आपण हरलो आणि मराठे जिंकले हे समजायला दाऊदखानला वेळ लागला. असा समोरासमोरचा संग्राम दाऊदखानच्या वाट्याला क्वचितच आला. त्याने माघार घेतली. त्याने घोडे वळवले. जे शरण आले, त्यांना महाराजांनी क्षमा केली. अखेरीस या लढाईत नव्याने संपत्ती आणि घोडे मिळाले. हे घेऊन महाराज अत्यानंदाने निघाले. या प्रसंगी बखरकार लिहितो.

'... राजा खासा घोड्यावर बैसून, बख्तर घुगी घालून, हाती पटे चढवून मालमत्ता, घोडी, पाईचे लोक पुढे रवाना करून आपण दहा हजार स्वारांनिशी सडे सडे राऊत उभे राहिले. वणी-दिंडोरी म्हणवून शहर आहे ते जागा उभे राहून सुभ्याचे लोक आले, त्याशी घोरांदर युद्ध केले...... राजियांनी आपली फौज पुढे करून पाठीवर आपण खास राहून झगडा दिधला. प्रतापराव सरनोबत व आनंदराव वरकड सरदार पुढे होऊन मोठी कत्तल केली.. आणि मोगल मारून मुरदे पडिले. दोन प्रहर युद्ध झाले. मराठे यांणी शर्त केली. तीन हजार मुघल मारिले. तीन हजार घोडे पाडाव केले. दोन वजीर मोगलाई सापडले. असे फत्ते करून आले.' अधिक काय सांगणे."

... आणि टोल पडला.

**संपर्क : ८४५९७७२०१८**



# चला चित्र रंगवूया...!!!

धनश्री केळकर





# गंमत जंमत

■ प्रा. रामदास केदार

ढगांकडे बोट दाखवत
आई लागली बोलू
विज्ञानाच्या रंजक गोष्टी
लागे एक एक खोलू

डोक्यावरती सूर्य येता
वाजत असतात बारा
पानाफुलांना झोका देतो
हळूच येऊन वारा

ढग ढगांना भेटत असता
वाजते विजांची टाळी
पुलकित होते आनंदाने
माती येथील काळी

मोजता येत नाहीत
आकाशातील असंख्य तारे
सूर्य चंद्र थांबत नाहीत
थांबत नाहीत वारे

वाचले पाहिजेत रोज
विज्ञानाचे रंजक धडे
पहा म्हणते गमतीजमती
बोट दाखवत आभाळाकडे

संपर्क : ९८५०३६७१८५

*मुकुंद टाकसाळे*

# ढोलूरामने चाखले चुलीवरचे आईसक्रीम

पुण्यात चिनूची आई हेल्मेट घालून स्कूटर चालवायची. चिनू तिच्यामागे तिला मिठी मारून बसायचा. आई काही तरी आणायला निघालेली असायची.

"आई, थांब, थांब. मला मिसळ खायचीय."

कधी मिसळ, कधी दाबेली, कधी भजी, कधी इडली, कधी मसाला दोसा... असं काही ना काही तरी त्याला दिसायचंच. मग आईला स्कूटर थांबवणं भागच पडायचं. आईला त्याचे लाड पुरवावे लागायचे. नाही तर तो रुसून बसायचा. बाहेर पडलं की काही तरी चमचमीत खायला त्याला फार आवडायचं. बाबा



कधीकधी आख्ख्या कुटुंबाला बाहेर जेवायला घेऊन जायचा. बाकीचे काहीही खाणार असले तरी हा 'मला चिकन लॉलीपॉप पाहिजे' असं जाहीर करायचा. तो त्याचा अत्यंत आवडता पदार्थ. तो ती प्लेट पुढे आली की एकटाच बकाबका खायला सुरुवात करायचा. ते दृश्य मोठं मजेशीर दिसायचं. सलीलदादालासुद्धा तो 'तुला हवंय का' असं विचारायचा नाही. सलीलदादा मुद्दामच त्याच्या प्लेटमध्ये हात घालायचा. त्यानं तसा हात घातला रे घातला की चिनू त्याच्या हातावर फटका मारायचा.

"मी तुझ्या प्लेटमध्ये हात घालतोय का? मग तू का घालणार?" पण सलीलदादा तरीही त्याच्या प्लेटमधले एक दोन लॉलीपॉप खायचाच. मग त्या दोघांचे भांडण व्हायचे.

"ढोलूराम, किती अप्पलपोट्या आहेस रे तू!" सलीलदादा चिडून म्हणायचा.

त्याच्या बाबाला सारं गावरान – गावाकडलं खायची फार हौस होती. चुलीवरच्या भाकरी, चुलीवरचं मटण, चुलीवरचा झुणका, चुलीवरची मिसळ, चुलीवरची चिकन.... अशी कुठलीही पाटी दिसली की बाबा त्याला घेऊन तिथं गेलाच म्हणून समजायचं. बाबा एकटा जायचा नाही. बरोबर साऱ्या कुटुंबालाही न्यायचा. बाबाच्या बरोबरीनं चिनूलाही हे चमचमीत पदार्थ खूप आवडायला लागले.

"बाबा, 'चुली'वरचं म्हणजे काय रे?" एक दिवस त्यानं बाबाला विचारलं.

"ऍॅ रे. एवढंही माहीत नाही का तुला?" सलीलदादा मध्येच पचकला. पण त्यालाही 'चूल' हा प्रकार ठाऊक नव्हता. तो त्याच्या ताईला म्हणाला, "ताई, सांग गं याला."

ताईनंही चूल हा प्रकार कधी पाहिला नव्हता. पण ती म्हणाली, " तुला इतकी सोपी गोष्ट माहीत नाही? कमाल आहे तुझी! चूल म्हणजे ती ही रे..." हाताने




काही तरी आकार दाखवत ती म्हणाली, "अशी असते बघ.."

बाबाच्या लक्षात आलं की यांच्यापैकी कुणीच चूल पाहिलेली नाही. मग तो हॉटेलच्या मालकाची परवानगी घेऊन थेट भटारखान्यात गेला. तिथं मोठी मातीची चूल पेटलेली होती. चूल कसली चूलखंडच ते! काही बायका त्यावर भाकऱ्या भाजत होत्या. वरच्या मोठ्ठ्या भांड्यात मटण रटरटत होते. कुणी तरी मोठ्ठा डाव घेऊन ते हलवत होता. निरनिराळ्या पदार्थांचा घमघमाट सुटलेला होता. वैलावर – चुलीला लागून असणाऱ्या शेजारच्या छोट्या मातीच्या चुलीवर वांग्याच्या भाजीचं भांडं मंद आचेवर ठेवलेलं होतं. मुलांनी यापूर्वी फक्त गॅसच्या शेगड्या पाहिलेल्या होत्या. त्यांना हा सारा प्रकारच नवा होता. आतून घामाघूम होत सारे जण बाहेर आले.

पुढे कधी तरी चिनू आईबरोबर स्कूटरवरून चालला असताना त्याला एका हॉटेलवर पाटी दिसली – 'चुलीवरचे आईसक्रीम.'

"आई, आई, थांब थांब," चिनू ओरडला, "मला चुलीवरचं आईसक्रीम खाऊन पाहायचं आहे."




मागे त्यानं आईसक्रीम कसं तयार करतात ते पाहिलेलं होतं. पण कितीही डोकं खाजवलं तरी त्याला चुलीवर आईसक्रीम कसं तयार करत असतील ते काही सांगता येत नव्हतं. खरंच कसं करत असतील चुलीवरचं आईसक्रीम? तुम्ही काही सांगू शकाल? लढवा डोकं!

तो आईबरोबर आत गेला. त्यानं चुलीवरच्या मँगो आईसक्रीमची ऑर्डर दिली. त्याला वाटलं आता गरमागरम आईसक्रीम पुढे येईल. पण नेहमीसारखं थंडगार आईस्क्रीम टेबलावर आलं. त्यानं एक चमचा चाखून पाहिलं. आंब्याच्या चवीचं थंडगार आईसक्रीम. आईलाही उत्सुकता होती. म्हणून तिनं चिनूतल्या आईसक्रीममधलं एक चमचा आईसक्रीम काढून चाखून पाहिलं. चिनूला ते काही आवडलं नाही. त्यानं डोळे वटारून आईकडे पाहिलं. आईसक्रीम नेहमीसारखंच लागलं.

हॉटेलच्या गल्ल्यावर बसलेल्या मालकाला आई पैसे देत असताना त्यानं विचारलं, "तुम्ही हे आईसक्रीम चुलीवर कसं केलं?"

"चल, तुला दाखवतो," मिशावाले मालक हसून म्हणाले. आत मोठ्या चुलीवर दूध तापत होतं. ते म्हणाले, "आईसक्रीम करण्यापूर्वी आम्ही या चुलीवर दूध तापवून घेतो. म्हणून हे 'चुलीवरचं आईसक्रीम'. हे सांगताना मालक गालातल्या गालात हसत होते. "अलीकडं चुलीवरच्या पदार्थांची फॅशन आलेली आहे. म्हणून आम्ही विचार केला की आईसक्रीमही चुलीवरच करून द्यावं. तसं हे केलं. तुला आवडलं ना आमचं आईसक्रीम?"

मालक आपली मजा करताहेत हे चिनूच्या लक्षात आलं. आपलीच नाही तर 'चुलीवरचे आईसक्रीम' अशी बाहेर पाटी लावून ते बाहेरच्या सर्वच लोकांची मजा करत होते.तो हसायला लागला. आईलाही हसू फुटलं.

**संपर्क : ९८५०८१७२१०**

# चिन्हांचा कलह

■ प्रा. चंद्रसेन टिळेकर

एकदा काना मात्रा आले हमरीतुमरीवर
ठिय्या मांडून बसले समोरासमोर!

मात्रा म्हणे, लिखाणात मी ठायी ठायी
काना म्हणे, उगाच बरळू नका काही बाही!

साध्या खणातला 'ख'काना लागता होतो खाण
मनातल्या 'म' ला लागता होतो मान!

सगळ्या अक्षरांना करावा लागतो 'आ' माझ्यापुढे
सांग आहे का तुला महत्त्व माझ्याएवढे?

मात्रा म्हणे स्वत:शी, हसावे की रडावे
या 'कान्या' ला माझे महत्त्व कसे सांगावे?

शब्दांवर जणू मोरपीस तिरपा माझा तुरा
बघ त्या शब्दांकडे होशील तू गोरा मोरा!

अरे नेट, भेट, ऐट, माझ्यामुळे शब्द सारे थेट
आणखी काही बरेच सांगेन, नंतर येऊन भेट!

अनुस्वार दुरूनच पहात होता गंमत
त्याने ठरविले, आपणही आणावी जरा रंगत!

बोले तो दोघांस अपुल्या अनुनासिक स्वरात
कशांस हों भांडतां तावातावांत?

म्हणे मात्रे तो, तुमच्या वाचून नाही घोडे अडत
तुमच्या जागी मी बसलो तरी फरक नाही पडत!

कुठे खोटे इथे तिथे नाते गोते असू द्या एके स्वरी
उडवुनी मात्रा कुठं, खोटं, इथं, तिथं, नातं गोतं मी करी!

धुंद, फुंद, मंद, गंध साकारती शब्द हे अनुस्वारे
मात्रेवरी माझीही मात्रा चाले परभारे!

स्वल्पविराम, पूर्णविराम, उद्गारचिन्ह जमले एकत्र
प्रश्नचिन्ह म्हणे, उत्तरासाठी माझेच पाय धरावे लागेल मात्र!

सगळ्यांनी मग केला एकच हलकल्लोळ
विरामचिन्ह म्हणे मनाशी थांबवावा हा पोरखेळ!

म्हणे ते, असे का येता घायकुतीला?
तुम्ही सारेच सजवता भाषेला!

तेव्हा द्या पूर्णविराम कलहाला सत्वर
करू या मराठी मायबोलीचा आपण सारे गजर!!

संपर्क : ९९६७७९५८३८



दीपाली चरेगांवकर

# दिनुला भेटली मराठी!

“आजोबा ‘इद्र्या’ म्हणजे काय हो?”

दिनुनं धापा टाकत आजोबांना विचारलं. अंगणात आजोबा आरामखुर्चीत पेपर वाचत होते. दिनुच्या प्रश्नावर त्यांनी पेपर बाजूला केला, आणि दिनुच्या अवताराकडे पाहत हसत म्हणाले, “काय दिनोबा-तुला कुणीतरी ‘इद्र्या’ म्हटलंय की काय?”

“हो ना आजोबा! अहो आत्ता मी रस्त्यावर सायकल फिरवत होतो ना... तर समोरून एक माणूस म्हशीला आणि तिच्या पिल्लाला घेऊन येत होता. माझा बॅलन्स गेला आणि चुकून त्याच्या अंगावरच गेली ना सायकल.”

“मग? मग काय झालं?” आजोबांना दिनुची गंमत वाटत होती.



"मग काय आजोबा....? मी पडलो ना... आणि तो माणूस पण चिडला. म्हणाला, ए इद्र्या डोळं फुटलं का काय तुजं? आता माज्या रेडकाचा पाय मोडला असता की!"

आजोबा हसू लागले,

"दिनोबा, अरे इद्र्या म्हणजे 'वेंधळ्या' बरं का! आमच्या कोल्हापूरच्या भाषेत वेंधळट माणसाला 'इद्र्या' म्हणतात. आता तुझी सायकल रस्त्यावर चालण्याऐवजी, माणसांच्या जनावरांच्या तंगड्यात शिरायला लागली म्हणजे वेंधळेपणाच नाही का? आणि दिनू म्हशीच्या पिल्लाला 'रेडकू' म्हणतात बरं का?

"आजोबा, मी इतका घाबरलो की सायकल तिथेच टाकून धूम ठोकली घराकडे" दिनू घाम पुसत म्हणाला. "असू दे... असू दे... मी सांगतो शिरपाला सायकल आणायला" आजोबा म्हणाले.

दिनू म्हणजे महाचळवळ्या, धडपड्या आणि चौकस मुलगा! नव्या नव्या गोष्टी शिकायची. जाणून घ्यायची त्याला खूप उत्सुकता असायची. तो पाचवीत शिकत होता. सुट्टीत आजोळी कोल्हापूरला आला होता. शिवाय त्याच्या लाडक्या मावशीचं लग्नपण होतं. त्यामुळं घरी भरपूर पाहुणे होते. मामे, मावस-भावंडं बऱ्याच दिवसांनी एकत्र जमली होती. दिनुला तर खूप मजा येत होती. किती नव्या नव्या गोष्टी त्याला बघायला मिळत होत्या, ऐकायला मिळत होत्या. त्याच्या चौकस बुद्धीला तर अगदी पौष्टिक खुराकच मिळत होता.

कालच मावशीच्या लग्नाच्या करंज्या केल्या. मम्माची धारवाडची मामी, नागपूरची जाडजूड आत्या, सोलापूरची मावशी, कोकणातली काकू, बापरे केवढे पाहुणे आले होते. दिनुला मम्माची धारवाडची मामी फार आवडायची. नऊवारी साडी, अंबाडा, त्यावर मोगरा, अबोलीचा गजरा, नाकात चमकी, हातात भरपूर काचेच्या, सोन्याच्या बांगड्या! लग्नाकार्यात केव्हाही भेटल्या की मम्माच्या पाठीत धपका घालून म्हणायच्या, "अय्योऽ पाऽऽऽ! किती वाळलंय गं लेकरू? त्याला काय चांगलं चुंगलं खायला घालतीऽस का स्वतःच हादडतीस गं स्वातेऽऽ?" मम्माच्या पाठीत धपका घालणाऱ्या सॉलिड डेअरिंगबाज मामीआजी दिनुला खूप आवडायच्या. करंज्या करायच्या वेळी नागपूरच्या आत्याबाईंनी मुलांना बाहेर पिटाळलं, "पळा नं पोटे हो... तिकडे अंगणात जाऊन खेळा." सगळे बाहेर गेले. दिनुला मात्र करंज्या कशा करतात ते पहायचं होतं. म्हणून तो तिथंच बसला. "ए, दिनू, जा बरं मुलांच्यात खेळायला..." दिनुची पुण्याची पियू मावशी म्हणाली.

"ए, बसू दे गं त्याला... हाताखाली करायला लागतंच की कोणीतरी... बराय... लिंबूटिंबू... जाऊ नको रे दिन्या..." धारवाडच्या मामी म्हणाल्या. "येवढं त्याला करंज्याचं अप्रूप आहे तर जा म्हणायलीस... आणि तुझ्या त्या दोन्ही पोरी नुसत्या हुंब! सारखा आपला हातात मोबाईल. जरा बोलव की त्याला... पारी लाटायला शिकीवते बघ त्याला." पियू मावशीला रागच आला. "मामी हल्ली मुलींना स्वैपाकपाणी यायला पाहिजे असं काही नाही. मुलगा.. मुलगी सगळं सारखं...!" पियू मावशी म्हणाली,

"ए, चला, चला गाणी म्हणूया आपण." वातावरण गरम होऊ लागलंय हे जाणवताच दिनुच्या मम्माने मध्यस्थी केली, "मामी सुर्वातीला आधी तुम्ही म्हणा हे तुमचं नेहमीचं गाणं."

"ए, न्हाई बाई, आता माझा आवाज काय पैल्यासारका ऱ्हायला न्हाई बघ" मामी म्हणाल्या. पण सगळ्यांनी खूप आग्रह केल्यावर मामी करंज्या तळता तळता गाऊ लागल्या, "घट्ट डोईवर..." मामी तल्लीन होऊन गात होत्या, पण इतर बायका एकमेकींना खाणाखुणा करून हसत होत्या. पण दिनुला खूप मजा आली. त्याला किती गोष्टी कळल्या. पारी म्हणजे काय? सारण म्हणजे काय? मोहन कशाला म्हणतात.

धारवाडची मामी करंजीला 'कानवला' म्हणत होती तर नागपूरची आत्या 'गुजीया' म्हणायची.

दिनुला हे सर्व आठवून हसू आलं. त्याला मम्माला बऱ्याच शंका विचारायच्या होत्या. तो मम्माजवळ गेला, "मम्मा काल तुम्ही त्या मामींना हसत का होतात? बॅड मॅनर्स हं मम्मा!"

"ए बॅड मॅनर्सवाल्या, अरे आमच्या मामी धारवाडच्या म्हणजे कर्नाटकातल्या! तिकडची भाषा एकदम कडक...

म्हणजे ट, ठ, ख अशी अक्षरं जास्त आणि ही कानडी भाषा प्रत्येक शब्दावर जोर देऊन बोलली जाते. मामींनी हे मराठी गाणं कानडी हेल काढून म्हटलं. मराठीत घट चा अर्थ घडा किंवा घागर पण मामींनी 'ट' वर जोर दिल्यामुळं तो 'घट्ट' म्हणजे 'जाम', 'पक्का' झाला, म्हणून आम्ही हसलो.

"पण त्या पियू मावशीच्या सारा... सोहाला हुंब म्हणाल्या म्हणजे काय गं?" दिनुने विचारले.

"अरे मावशीच्या दोघी मुली सारा आणि सोहा सतत मोबाईल घेऊन कँडी खेळत असतात. कुणाशी फारशा बोलत नाहीत. कामात मदत करत नाहीत. ते आमच्या मामींना आवडत नाही म्हणून त्या त्यांना हुंब म्हणतात म्हणजे एका जागी बसणाऱ्या... निष्क्रिय...!"

तेवढ्यात नागपूरच्या आत्या आल्या, मम्माला म्हणाल्या, "स्वाती, चल गं जरा महालक्ष्मीच्या मंदिरापर्यंत जाऊन गिरकी मारून येऊ !"

"बरं ठीक आहे, ए चला आपण सगळेच जाऊ, दिन्या, जा सगळ्या पोरींना पण बोलावून आण!"

"दीऽऽनू, तुम्ही पण जा रे आईसक्रीम भेळ खाऊन या." दिनुची आजी म्हणाली, दिनुला आजीचा एकदम रागच आला. कितीवेळा तिला सांगितलंय अगं दिनुतला 'दि' हस्व आहे दीर्घ नाही. अर्थ बदलतो ना... दीन म्हणजे गरीब. दीनू म्हणजे... 'गरीबु? शी... ह्या आजीला ना स्कॉलरशिपच्या बाईंकडेच न्यायला पाहिजे.'

दिनू सगळ्यांना बोलवायला गेला. सोलापूरचा सौरभ म्हणाला, "कां बे कुठं जायचं ठरलं? जरा थांब हा ओंकार कसला सॉलीड, सापांच्या भुतांच्या गोष्टी सांगायलाय."

"मग मी आणि नऱ्या केगदे काढायला आडीत गेलो नी... कसली गचपण तिकडे... तेवढ्यात फुस्सऽऽकन् आवाज इलो... बगतो तर काय...

म्हणजे आता तुम्ही सगळ्या जणी रस्त्यावर गिरक्या मारणार? कसं दिसेल ते? रस्त्यावरचे लोक हसतील ना तुम्हांला... तू जाऊ नको नां त्यांच्याबरोबर..." दिनू काकुळतीला येऊन म्हणाला. त्याच्या डोळ्यांसमोर काकू, आत्या, मामी, मावश्या, मम्मा रस्त्यावर गिरक्या मारताना दिसू लागले.

मम्माला हसूच आवरेना... "दिनू... अरे वेडोबा... गिरकी म्हणजे तसली नव्हे रे... गोल गोल फिरायची...! आपण कसं म्हणतो चल मार्केटमध्ये फेरी मारून येऊ... कॉलनीत चक्कर मारून येऊ... तसंच... नागपूरला गिरकी मारून येऊ म्हणतात. खरंच गं बाई हा शंकासूर आहे!" मम्मा हसत म्हणाली, "अरे दिनू आमच्या कोल्हापूरच्या भाषेला नागपूरची आतेभावंडं हसायची आणि आम्ही त्यांना... एकदा मला आत्यानं सांगितलं की, पलीकडच्या वेटोळीतून सांबार घेऊन ये. मला कळेचना... मग मला आत्यानं सांगितलं की वेटोळी म्हणजे गल्ली... लेन... आणि सांबार म्हणजे कोथिंबीर...! आहे ना गंमत!" दिनुला जाम गंमत वाटली.

सगळे जण देवळापर्यंत गिरकी मारून आले. येताना मस्त भेळ, आईसक्रीमवर ताव मारला. घरी आल्यावर अंगणात बसलेल्या आजोबांभोवती सगळी नातवंडं बसली.

"आजोबा आम्हांला गोष्ट... गोष्ट...!" सगळ्यांनी कल्ला केला.

तेवढ्यात शिरपा म्हणाला, "पोरांनो दमा वाईच! साळुत्यानं मी येवडं आंगन लोटतो. मोटा जमकाना हातरून देतो. मग बसा निवांत... आज्ज्याच्या कान्या ऐकत... आबाळातलं तारं बगत...!"

शिरपाचं बोलणं ऐकून दिनुचे डोळे मोठे झाले. मम्माचं लक्ष त्याच्याकडे गेलं.

ती शिरपाला म्हणाली, "अरे बाबा शिरपा... सगळ्यांना समजेल अशा मराठी बोल! आमचा हा दिनोबा बघ कसा कान टवकारून बसलाय. दिन्या ऐक, आमच्या कोल्हापुरी भाषेत झाडू किंवा केरसुणीला 'साळुता' म्हणतात. लोटून काढतो म्हणजे झाडून काढतो. जमखाना म्हणजे मोठी सतरंजी... आणि आज्जा म्हणजे ग्रामीण भाषेत आजोबा...! कळलं...? हुश्श" असं म्हणून दिनुच्या मम्मानं एक दीर्घ सुस्कारा सोडला.

आजोबा म्हणाले, "अरे ही सगळी मराठी भाषेचीच रूपं! सातारा, सांगलीकडची रांगडी भाषा... नागपूरकडची म्हणजे विदर्भातली वऱ्हाडी, जळगाव खानदेशकडची अहिराणी... कोकणातली कोकणी, मालवणी...! वसई, रायगड जिल्हा, आणि मुंबईच्या काही भागात बोलली जाणारी आगरी ह्या सगळ्या मराठीच्याच मुली...! त्यांना



मूळ प्रमाणभाषेच्या बोली भाषा म्हणतात. ज्यात प्रत्येकाचे वेगवेगळे समानार्थी शब्द असतात. ते जाणून घ्यावेत. मजा येते बरं का खूप...!"

सगळी मुलं मराठी आणि तिच्या बोली भाषेची कथा मन लावून ऐकत होता. गोष्ट ऐकता ऐकता दिनुचा डोळा लागला. त्याच्या स्वप्नात एक बाई आली. ती कधी धारवाडच्या मामीसारखी दिसत होती कधी नागपूरच्या आत्यासारखी दिसत होती तर कधी कोकणातल्या काकूसारखी...!

दिनुला म्हणत होती, "ऐक... मी तुला एक कोडं घालते...

"संस्कृत माझी माय...
कानडी, तेलगु, बंगाली, गुजराथी
माझ्या बहिणीच तर काय !
कोकणी, अहिराणी मालवणी, वऱ्हाडी
मुली आहेत माझ्या,
मी कोण? बघ ओळखलंस का राजा?"

दिनू झोपेतच जोरात ओरडला, "मराठी" !

**संपर्क : ९५५२९५४०६५**

पंडित विद्यासागर



# कुतूहल जागृती!

# ओवी एक विज्ञानाची

विज्ञानाची मैत्री करायची तर विज्ञानाची सुरुवात कशी झाली हे माहीत करून घ्यायला हवे. तुम्हांला माहीत आहे की फार प्राचीन काळात मनुष्य रानटी अवस्थेत राहत होता. त्या काळी शेतीचा शोध लागला नव्हता. अन्न आणि पाणी मिळवण्यासाठी त्याला भटकावे लागे. त्यात हिंस्र प्राण्यांपासून संरक्षण करण्यात त्याचा वेळ जात असे. तो निसर्गात बदल होताना पाहत होता. सूर्या-चंद्राचे उगवणे- मावळणे, बदलणारे ऋतू, इंद्रधनुष्य, सूर्य आणि चंद्राची होणारी ग्रहणे. वादळ आणि पाऊस, कडाक्याची थंडी आणि कडक ऊन असे अनेक बदल तो अनुभवत होता. या सर्व घटना त्याला नक्कीच अचंबित करीत असणार. या घटनांबद्दल त्याच्या मनात कुतूहलही निर्माण होत असणार. परंतु या सर्व घटनांवर विचार करायला त्याला सवडच नव्हती. मानवाने शेतीचा शोध लावला. त्यामुळे त्याला वसाहती स्थापन करणे शक्य झाले. संरक्षणाचा प्रश्न काही प्रमाणात सुटला. धान्याची साठवण केल्यामुळे दररोज अन्न गोळा करण्याची गरज उरली नाही. अशा प्रकारे मोकळा वेळ काढणे शक्य झाले. सर्व जण रिकाम्या वेळेचा चांगला उपयोग करतातच असे नाही. काही जण मात्र या वेळेचा उपयोग त्यांच्या मनात जे कुतूहल निर्माण होत होते त्याचे उत्तर शोधण्यासाठी करू लागले. पुढील ओव्यांमध्ये हेच सांगितले आहे.

***मानवामधील काही नारी नर***
***होती विचारमग्न फार***
***नवल करीती हे चराचर***
***कसे निर्माण जाहले***
***पाहती चंद्र सूर्याचा खेळ***
***घालू पाहती नक्षत्रांचा मेळ***
***विस्मित करी ग्रहणकाळ***
***कार्यकारण काय असे ?***

एखादी गोष्ट माहीत करून घेण्याची इच्छा निर्माण होणे म्हणजे कुतूहल. तुमच्या मनातही असे कुतूहल निर्माण होत असणार. निसर्गात अशा अनेक घटना आणि प्रसंग घडतात की मनात कुतूहल निर्माण होते. लहान मुलांमध्ये कुतूहल अधिक प्रमाणात असते. उदाहरणार्थ झाडांची पाने हिरवी का दिसतात? सकाळी आणि संध्याकाळी सूर्याचे बिंब लाल का दिसते? आकाश निळे का दिसते? असे अनेक प्रश्न सांगता येतील. तुमच्या मनातही असे प्रश्न येत असणार. एकदा एका मुलाने मला प्रश्न विचारला. तो असा होता. "दिवसा आकाशात दिसणाऱ्या विमानांचा आवाज येतो मात्र रात्री दिसणाऱ्या विमानांचा आवाज येत नाही. असे का?" खरे सांगायचे तर मीही याचा विचार केला नव्हता. विचार केल्यानंतर ध्यानात आले की

दिवसा किंवा रात्री कमी उंचीवरून उडणाऱ्या विमानांचा आवाज ऐकू येतो. याउलट रात्री खूप उंचीवरून जाणारी विमानेही दिसतात. त्यांचा आवाज मात्र ऐकू येत नाही. त्यामुळे आपला असा समज होण्याची शक्यता असते.

जीवनात कुतूहल जागृत ठेवण्याचे खूप महत्त्व आहे. न्यूटन हे नाव तुम्ही ऐकले असेल. लहानपणापासूनच घडणाऱ्या गोष्टींबद्दल त्यांना कुतूहल होते. त्यांचे वडील लहानपणीच वारल्यामुळे त्यांचा सांभाळ त्यांच्या आईने केला. गरिबी असूनही ती न्यूटनला प्रोत्साहन देत असे. एकदा गावच्या जत्रेत विस्मयकारक प्रयोग दाखवले जात होते. न्यूटनने आईजवळ हट्ट करून मित्रांसोबत ते प्रयोग पाहायची परवानगी मिळवली. एका ठिकाणी काचेचा लोलक टांगलेला होता. त्यावर एका बाजूने प्रकाश झोत टाकला होता. त्यामुळे दुसऱ्या बाजूला पडद्यावर रंगीत पट दिसत होता. तो पाहताना मुले दंगा करीत होती. त्यातच कुणाचा तरी धक्का लागून तो लोलक हलला. त्यामुळे रंगीत पट दिसेनासा झाला. मुले घाबरून पळून गेली. न्यूटन मात्र तिथेच थांबला. त्याचे कुतूहल त्याला स्वस्थ बसू देत नव्हते. तो पट पुनः कसा आणता येईल याचा विचार करू लागला. थोड्या प्रयत्नांनंतर त्याला यश मिळाले. त्या प्रदर्शनाचा मालक हे पाहून खूश झाला. त्याने न्यूटनला शाबासकी दिली. घटनेमुळे न्यूटनचा आत्मविश्वास वाढला आणि त्याने पुढे स्वतंत्रपणे अनेक विज्ञानविषयक प्रयोग केले.

कल्पना चावला हे नाव तुम्ही ऐकले असेल. अवकाशात जाणारी ती पहिली भारतीय महिला होती. तिला लहानपणापासून अवकाशाविषयी खूप कुतूहल होते. ती मैत्रिणींबरोबर अवकाशात जाण्याची स्वप्ने रंगवायची. त्यासाठी तिने अवकाश यान कसे असेल याचे चित्रही काढले होते. पुढे ती अवकाश यात्री बनण्याचे प्रशिक्षण घेऊन ती अवकाशात गेली. तर मित्रांनो, कुतूहल जागृती ही विज्ञानाशी मैत्री करण्याची पहिली पायरी आहे. पुढची पायरी आहे निरीक्षण. त्याचा विचार पुढच्या भागात करू.

**संपर्क : ९४२०४८३४८७**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी सोहेल एंटरप्रायजेस सर्व्हे नं. ४८, घर पट्टी नं. ४०२, भांडार्ली व्हिलेज, नॅशनल काट्याजवळ, ठाणे ४०० ६१२, येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक– कृष्णकुमार पाटील.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Sohail Enterprises, S.No. 48, Ghar Patti No. 402, Bhandarli Village, Near National Kata, Thane- 400 612 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune- 411 004 * Editor : Krishnakumar Patil.**

# मोबाईल

■ लक्ष्मण शिंदे

कर ना गं घाई
मला झोप आली आई
ठेव आता मोबाईल
गा छान अशी अंगाई

रात्र झाली फार आता
बघ चंद्र झोपी गेला
आई ये ना गं जवळ
झोपेला उशीर झाला

किडे किरकिरतायत
किती अंधार पडला
कर नेट बंद आता
जीव घाबराघुबरा झाला

पाटी पेन्सिल घेतली
लिहिलंय अ ब क ड
छान कसं लिहिलंय
बघ जरा त्याच्याकडं

सोड गं तो मोबाईल
कर तू संगत मला
काय झालं शाळेत
सांगू का गं जरा तुला

बघते मी रात्रंदिवस
मोबाईल तुझ्या हाती
कर आमची काळजी
होऊ दे त्याची माती



संपर्क : ७०३८९९७७६६

रूपांतर : चेयेन रंदाल

अनुवाद : माधुरी दीक्षित

फार वर्षांपूर्वी एक शेतकरी त्याच्या मळ्यात काम करत होता. त्यानं मातीतून एक छान, भलं मोठं रताळं खणून काढलं.

"मस्त फराळ होईल याचा." शेतकरी आनंदानं म्हणाला.

तेवढ्यात रताळं चक्क ओरडलं, "सोड सोड, खाली टाक मला!"

"मला मातीतच राहायचंय"

"तुझ्या पोटात अजिबात जायचं नाहीये मला."

आता, रताळं कधी बोलत असतं का सांगा बरं! शेतकऱ्याला काय करावं सुचेना. तो हे नवल राजाला सांगायला धावत सुटला.

रस्त्यात त्याला एक बाई भेटली. तिच्याजवळ एक शेळी होती.

"अरे, थांब, थांब." ती बाई म्हणाली.

"असा काय पळत सुटलाहेस?"

"अगं बाई, माझ्या मळ्यात एक बोलणारं रताळं निघालं." शेतकरी म्हणाला.

# बोलणारं रताळं



ते मला म्हणालं, “सोड सोड, खाली टाक मला!”

ते ऐकून शेळीनं विचारलं, “मग, टाकलं का तुम्ही ते खाली?”

आता शेळी कुठं बोलत असते होय?

त्या बाईला आणि त्या शेतकऱ्याला कळेना हा काय प्रकार आहे ते.

ते दोघेही राजाला ही बातमी सांगायला पळत सुटले.

त्यांना रस्त्यात एक माणूस दिसला.

तो कुऱ्हाडीनं झाडं तोडत होता.

“अरे, थांबा, थांबा.” तो ओरडला.

“कशाला पळताय असे?”

“अहो, माझ्या मळ्यातलं रताळं बोलायला लागलंय.” शेतकरी म्हणाला.

ते म्हणालं, “सोड सोड, खाली टाक मला!”

“माझी शेळीसुद्‌धा बोलली हो!” ती बाई सांगू लागली.

“काय म्हणाली तुमची शेळी?” कुऱ्हाडीनं विचारलं.

“कुऱ्हाड कधी बोलत असते का? सांगा पाहू.”

तो माणूस, ती बाई, तो शेतकरी सगळेच अचंबित झाले. त्यांना काय करावं कळेना. ते राजाला सांगायला धावत निघाले.

“अरे, थांबा, थांबा!” राजा म्हणाला.

“का असं पळत आलात सगळे?”

“राजे सरकार, माझ्या मळ्यातलं रताळं बोललं!”

“महाराज, माझी शेळीसुद्‌धा बोलायला लागलीय.” ती बाई सांगू लागली.

“माझी कुऱ्हाडसुद्‌धा बोलली हो.” तो माणूस




म्हणाला.

राजा वैतागला.

“चला निघा तुम्ही सगळे,” तो ओरडला.

“आणि अशा मूर्खपणाच्या गोष्टी सांगत फिरू नका, नाहीतर मी रागावेन.”

त्या शेतकऱ्याला, त्या बाईला आणि त्या माणसाला राजा सांगेल तसं करण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नाही.

ते निमूटपणे माघारी गेले.

ते गेले तसा राजा आपल्या सिंहासनावर बसला, आणि त्यानं नाराजीनं मान हलवली.

“काय हे? बोलणारं रताळं म्हणे. मूर्खपणाच्या गोष्टी सगळ्या!” तो उद्‌गारला.

“हो ना! वेडपणाच म्हणायचा हा, नाही का?” राजाचं सिंहासन म्हणालं.

“कुणाला खरं वाटेल की रताळी बोलायला लागलीत म्हणून?”

*(चेयेन रंदाल यांनी रूपांतरीत केलेल्या The Talking Yam या Hyperion Paperbacks for children – New York प्रकाशनाच्या पुस्तकातील The Talking Yam या आफ्रिकन लोककथेचा साभार मराठी अनुवाद)*


**संपर्क : ९४२३५८६३४८**

या पाच चित्रांच्या सुरुवातीच्या मराठी अक्षरांवरून एका फळाचे नाव तयार होते ते शोधून लिहा पाहू.



## मराठी शब्द संग्रह वाढवा... योग्य जागेत शब्द भरा...

१) एक फूल
२) गडबड होणे
३) मोठी बहिण
४) मुलीचे नाव
५) स्त्री
६) आई
७) गावाचे नाव
८) लिहिण्यासाठी पेनात वापरतात



# लिहावे कसे?

■ कृष्णा खंडू कुदळे

आधी गोल नंतर रेष
हीच रीत 'व' लिहिण्याची
क्रम त्याचा कराल उलटा
दिशा बदलते वागण्याची ||१||

ख आणि छ लिहिताना
वाटीला जोडूया सात
अभ्यासाला बसू ताठ अन्
काटकोनात दोन्ही हात ||२||

लक्षपूर्वक काढले पाहिजेत
अक्षरांचे नाजूक देठ
विसरू नका ही लक्षात ठेवा
छ, ड, द, ढ, ह, ळ आणि ट, ठ ॥३॥

'भ' अक्षरामध्ये उभा 'एक'
'श' मध्ये तो तिरपा येई
तिरप्या 'एक' ला 'पाच' जोडता
अवघड' 'क्ष' ही सोपा होई ||४||

'ज' आणि 'च' काढत असता
दिशा वाटीची उलट असे
'ढ' ला जोडता तिरपी रेष
वळणदार 'द' सहज येतसे ॥५॥

गोल काढा 'क' आणि 'ळ'
एकसारखे जणू दोन आकार
सरावाने हे होईल साध्य
सुंदर लिहिण्याचे स्वप्न साकार || ६ ||

संपर्क : ९८६०४३६१९९

डॉ. वर्षा तोडमल



# सुट्टी रे सुट्टी... शब्दांशी गट्टी....

**भाषिक खेळ गंमत खेळ....**

लहान मुलांना काय आवडते! खेळायला, मज्जा करायला आणि रोज नवे नवे काहीतरी आवडते! आनंद खेळ आणि नावीन्य त्यांना हवे असते. मराठी तिच्या सौंदर्यासह टिकणं फार महत्त्वाचे आहे. भाषा उत्तम येण्यासाठी शब्दांचा रियाज लागतो आणि त्यासाठी शब्दांशी मैत्री करावी लागते. भाषेच्या उत्सवातून शब्दमैत्र वाढवू या. श्रवण, संभाषण, लेखन पूर्वतयारी, वाचन पूर्वतयारी या क्षमतांचा या खेळातून विकास होईल. मुलांना खेळाचे आकर्षण असते. त्यांना भरपूर भाषिक खेळही खेळू द्या. त्यातूनच अनेक गोष्टी ती आत्मसात करतील. रटाळ पद्धतीने शिकवण्यापेक्षा खेळाच्या द्वारे शिकवले तर मुले जास्त चांगल्या रीतीने भाषा शिकतात आणि ती त्यांच्या दीर्घकाळ लक्षातही राहते. भाषा विकासाच्या दृष्टीने काही उपयुक्त खेळ पुढीलप्रमाणे.

**खेळाची तयारी**

हा खेळ घरातल्या घरात किंवा सोसायटीत कितीही जणांत खेळता येतो. प्रत्येक खेळ दोन गटात खेळायचा. एक गट मुलांचा आणि एक गट मुलींचा. सर्वात जास्त शब्द जो गट सांगेल तो जिंकला.

**नियम–** प्रत्येक गटाला शब्द आठवून सांगण्यासाठी वेळेची मर्यादा जास्तीत जास्त एक मिनिट असेल. एक मिनिटात शब्द आठवला नाही तर संधी दुसऱ्या गटाला मिळेल.

**चला खेळूया....**

१. यमक जुळवणे

मुलं आणि मुली असा गट करून त्यांना एका भाजीचे नाव देऊन त्याच्या यमक जोडीचे नाव सुचवण्याचा खेळ घेता येईल. सर्व मुलांना आवश्यक ते मार्गदर्शन करून खेळ रंजक करता येईल.

| | |
|---|---|
| गवार | पवार |
| भोपळा | ढोकळा |
| आंबा | थांबा |
| काजू | बाजू |
| अंजीर | खंजीर |
| मटार | गिटार |
| झोपाळा | गोपाळा |
| पक्षी | नक्षी |
| फूल | मूल |
| बाक | नाक |

**१.शब्दांच्या भेंड्या**

**साहित्य–विविध चित्रे**

मुलांनी स्वतःच चित्रे काढलेली असतील तर छानच. मुलांना आपली चित्रे ओळीने मांडायला सांगायचे आणि मांडलेल्या चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. प्रत्येक चित्राच्या मागे मध्यभागी पट्टी चिकटवून चित्र उभे केले तर मुलांच्या नजरेसमोर चित्रे सतत राहतील. चित्रनिरीक्षणाची मुलांना संधी द्यायची. मुलांना चित्र निरीक्षणातून शब्दांच्या भेंड्यांकडे वळवायचे. समजा, पहिले चित्र मासे पकडणाऱ्याचे आहे. मासा, गळ इत्यादी शब्दांचा मुलांना परिचय करून द्यायचा. कोळ्याच्या चित्रातील वर्णनाप्रमाणे आईने एखादे बडबड गीत म्हणून दाखवायचे.

***कोळी गेला तळ्यावर***
***गळ सोडला पाण्यावर***
***गळाला होता पिठाचा गोळा***
***खाण्यासाठी झाले मासे गोळा***
***गोळा खाताना पिठाचा***
***मासा अडकला कायमचा***
***युक्ती करून कोळ्याने***
***टोपली भरली माशाने.***

मासे कसे पकडतात? तर ओढा, नदी, तळे, विहीर, इत्यादी ठिकाणी गळ लावून मिळतात किंवा समुद्रात जाऊन पकडतात हे मुले आपोआप शिकतील. चित्राकडे पाहून आईने एखादा शब्द सांगायचा. त्यातील शेवटच्या अक्षराने सुरू होणारा शब्द मुलाने सांगायचा. मुलांना शब्द सांगायची संधी द्यायची.

उदाहरणार्थ, मासा, साप, पतंग, गवत, तवंग, गंमत, तवा, वारा, रवी, वाटी, टरबूज.. इत्यादी.

**२.अक्षरांची झुकझुक गाडी...**

कुंभार दादांचे एखादे चित्र दाखवावे. चित्राकडे पाहून आता एखादे बडबड गीत सांगावे. म्हणजे चित्रातील कल्पना अधिक स्पष्ट होईल.

कुंभाराने चाक फिरवले **गरगर**
मातीची मडकी झाली **सरसर**
गाढवाच्या पाठीवर ठेवली **भरभर**
बाजारात गेला **झटपट**
विकून टाकली **पटपट...**

बडबडगीतातील गरगर, सरसर,भरभर, झटपट, पटपट.... या शब्दांवरून पुढे अक्षरांची झुक झुक गाडी सुरू करायची.

बैलगाडी खुळखुळखुळ
गाडी चालली दूडदूडदूड
गाडीत बसले किती जण
गाडीत बसले साती जण

आईने एक शब्द सांगायचा त्याला जुळणारा शब्द मुलांकडून वदवून घ्यायचा.

झाड-माड, मान-पान, दात-नात, कपाट-सपाट, रवा-खवा, अंगत-पंगत

मुलांनी जुळणारे शब्दसांगत राहायचे.

टकटक, सटसट, वटवट, कटकट, थयथय... इत्यादी.

पाऊस - **रिमझिम, मुसळधार, धुवाधार, भूरभूर, झिरझिर, टपटप, झिमझिम, धोधो...**

जुळणाऱ्या शब्दांचा खेळ चालू ठेवायचा.

**३.शब्दांच्या जोड्या लावा**

ज्या वस्तू सर्वसाधारणपणे जोड्यांमध्ये आढळतात त्यापैकी एक वस्तू आईने सांगावी, दुसरी मुलांना सांगायला लावावी.

खल - बत्ता, बूट- मोजे, कप - बशी, कुलूप-किल्ली, पाटा-वरवंटा, सुई-दोरा, पोळपाट -लाटणे, कढई-झारा,

**४. वाक्य मोठी करा.**

आईने एक शब्द सांगायचा. मुलांनी त्यात एकेका शब्दाची भर घालत वाक्य वाढवत न्यायचे.

दिवाळी... उदा. दिवाळी सण. दिवाळी सण मोठा. दिवाळी सणात आनंद मोठा.

कवी केशवसुतांच्या शब्दात जरा बदल करून म्हणावेसे वाटते की शब्दांमधला आशय केवढा? ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा. आणि याची प्रचिती मुलांशी बोलताना येते. कशी असते मुलांची भाषा, सहज उत्स्फूर्तता, निरागसपणामुळे येणारा विनोद, नवशब्द निर्मिती, भन्नाट कल्पनाशक्ती...हा भाषा समृद्धीसाठीचा ठेवाच असतो. मुलांसाठी भाषाखेळ आवश्यक आहे. यातूनच मराठीची गोडी निर्माण होईल.

**खेळ खेळूया गमतीचे**
**खेळ खेळूया जमतीचे**

**संपर्क : ९०९६९५१२००**

# विद्यार्थी हिताच्या विविध शासकीय योजना

केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत १ ली ते १२ वी इयत्तांशी संबंधित विद्यार्थी लाभाच्या विविध योजना शिक्षण संचालनालय ( योजना ) महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयामार्फत राबविण्यात येतात. यात आर्थिक दुर्बल घटक,पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी, कनिष्ठ महाविद्यालयांतील खुल्या गुणवत्तेमधील विद्यार्थी, माजी सैनिकांची तसेच प्राथमिक, अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मुले, दिव्यांग, धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थी, टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थी यांच्याकरिता राबवण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा समावेश आहे. तसेच भारतीय सैनिक महाविद्यालय डेहराडून, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमध्ये संस्कृत भाषा शिक्षण याकरिता देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती, सर्वांसाठी इयत्ता १०वी पर्यंतचे मोफत शिक्षण तसेच इयत्ता ११ वी व १२ साठी मुलींना मोफत शिक्षण, राजीव गांधी विद्यार्थी सानुग्रह अनुदान, केंद्र सरकार पुरस्कृत उल्लास –नवभारत साक्षरता कार्यक्रम आदी विविध शासकीय योजना आहेत. या योजनांची माहिती खालील QR Code वर एकत्रितपणे देण्यात आली आहे.

https://me-qr.com/Khym4nAF

सदर QR Code द्वारे देण्यात आलेल्या केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत विद्यार्थी लाभाच्या या विविध शासकीय योजनांची माहिती मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना व पालकांना अवगत करून द्यावी. तसेच सदर योजनेकरिता पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनांचा लाभ मिळवून द्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

**डॉ. महेश पालकर**
संचालक
शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संपर्क : ०२०–२६१२६७२६, ई–मेल : directorscheme.mh@gmail.com

जयश्री काटीकर

# मात्यांच्या माहित्या??!!



आपले स्वराली आणि स्वराज आज भांडणाच्याच पवित्र्यात होते. स्वराली मोठी, सातवीत आणि स्वराज धाकटा सहावीत!

"बघ, बघ मी तीन माहित्या मिळवल्यात!" स्वराज भलत्याच उत्साहात स्वरालीला म्हणाला.

पण स्वरालीला काहीतरी खटकलं. ती त्याला बरोबर करत म्हणाली, "अरे, माहिती कमी किंवा पुष्कळ असते किंवा खूप सुद्धा असते. पण दोन-चार माहिती असं काही नसतं बरं का! आणि माहित्या? असं तर नसतंच नसतं."

"असं कसं? जर एक आकृती आणि चार आकृत्या असतात, तर एक माहिती आणि चार माहित्या, हे का बरं चूक? तूच काहीतरी चुकीचं बोलतेयस." जुंपलं ना दोघांचं भांडण!

दोघांपैकी कोणीच हार मानायला तयार नव्हतं. तुम्हांला काय वाटतंय, कुणाचं बरोबर आहे? पाहा बरं जरा विचार करून. आता आजोबांकडे जाण्याशिवाय काही पर्यायच शिल्लक नव्हता. कारण स्वराली-स्वराजपैकी कुणीच मागं हटायला तयार नव्हतं. कोणाचं बरोबर, हे आता आजोबांशिवाय सांगू तरी कोण शकणार होतं? दोघंही आजोबांच्या पुढ्यात जाऊन उभं राहिले. आणि आजोबांचं तर माहीतच आहे ना तुम्हांला, सरळ सरळ कधी उत्तर देणारच नाहीत ते! काहीतरी शोधायला-करायला सांगणार म्हणजे सांगणारच! आणि ते करण्यात मज्जाच मज्जा असते, हे पण दोघांनाही माहीत होतं. म्हणूनच तर ते संधीच शोधायचे आजोबांकडे जायची.

आता आजोबा 'माझंच बरोबर', म्हणणार, असं दोघांनाही वाटत होतं. पण आजोबांनी केलं भलतंच!

आजोबा म्हणाले, "मी एक शब्द दोनप्रकारे वाक्यात उच्चारतो. कोणता उच्चार तुम्हांला चुकीचा वाटतोय, कानाला खटकतोय ते सांगा बरं का!"

दोघं सरसावून बसले.

"मी खूप मात्या गोळा केल्या." हे बरोबर वाटतं की "मी खूप माती गोळा केली." हे बरोबर वाटतं?

"माती गोळा केली.." स्वराली-स्वराज म्हणाले.

"आता दुसरं वाक्य हं!" आबा म्हणाले

"गणपतीत आम्ही वेगवेगळ्या आरत्या म्हणतो की गणपतीत आम्ही वेगवेगळ्या आरती म्हणतो? यातलं काय बरोबर वाटतं?" – "आरत्या.." दोघंही म्हणाले.

"महाराष्ट्रात किती नद्या आहेत, हे बरोबर की महाराष्ट्रात किती नदी आहेत, हे बरोबर?"

"नद्या.."

"भाषण ऐकून मला खूप स्फूर्ती मिळाली बरोबर की भाषण ऐकून मला खूप स्फूर्त्या मिळाल्या, हे बरोबर?"

"स्फूर्ती.." आता दोघंही पुरते गोंधळले.

माती – मात्या, स्फूर्ती - स्फूर्त्या हे चूक पण आरती – आरत्या, नदी - नद्या हे मात्र बरोबर!!

म्हणजे मग माहिती – माहित्या, हे चूक असू शकतं तर! मला वाटलं म्हणून एखादा शब्द चूक-बरोबर नसतो तर! पण मग याचा एखादा नियम नको का? किती गोंधळ होतो!!

आजोबांनी घसा खाकरला. तशी दोघांनी कान टवकारले!

“माती, आरती, नदी, माहिती, स्फूर्ती या दोन–चार शब्दांवरून आपल्याला एकवचन – अनेकवचन याबद्दलचा नियम तयार करता येईल का?” आजोबांनी आता गुगलीच टाकली.

“म्हणजे माझ्या मनातलं आजोबांना ऐकू गेलं की काय?”

“पण आजोबा,” स्वरलीला शंका आली. “२–४ उदाहरणांवरून नियम शोधता येतो?”

“खरंतर नाही. पण सुरुवात तर करूया.. बघूया मग आपण योग्य नियमापर्यंत पोचतो का ते?”

“या शब्दांचं अनेकवचन करताना काय बदल होतोय, म्हणजे शब्दाच्या मूळ रूपात काय बदल होतोय ते निरीक्षण करून सांगू शकाल?”

दोघं एकमेकांच्या तोंडाकडे बघू लागले.

“नदी–नद्या, आरती–आरत्या – अनेकवचन करताना शब्दाच्या शेवटच्या अक्षराकडे नीट लक्ष द्या बरं का!” आजोबांनी थोडी मदत केली.

“जोडाक्षर झालंय शेवटच्या अक्षराचं, आजोबा.” स्वराज भलत्याच उत्साहात म्हणाला.

“अगदी बरोबर, अजून काय सांगता येईल बरं?”

“या हे अक्षर जोडलं गेलंय ना आजोबा..?” स्वरालीने अचूक ओळखलं. आजोबांनी तिची अर्थातच पाठ थोपटली.

“म्हणजे आजोबा एकवचनाचं अनेकवचन होताना शेवटच्या अक्षराला ‘या’ जोडायचा ना? हाच ना नियम आजोबा, कित्ती सोप्पंय ना!”

“अगं थांब थांब, इतकी घाई करू नकोस नियम तयार करायची.” आजोबा स्वरालीला थांबवत म्हणाले,

“माती, माहिती, स्फूर्ती या शब्दांचं अनेकवचन होताना ‘या’ कुठे जोडला जातोय पण? त्यामुळे एवढ्यातच आपला नियम तयार नाही होणार बरं! अजून काय सारखेपणा आहे, सांगा बरं!”

“सगळ्यांच्या शेवटी ‘ती’ हे अक्षर आहे..” स्वराज

“अरे नदीत कुठे ‘ती’ आहे? नदी – दी आहे ना शेवटी!”.. स्वराली. “आजोबा, शब्दाच्या शेवटी ‘ई’ आहे ना?”

“अगदी बरोबर. या अशा ‘ई’ हा स्वर शेवटी असणाऱ्या शब्दांना ईकारान्त शब्द म्हणतात हं! म्हणजे हे सगळे शब्द ईकारान्त आहेत” आजोबांनी माहिती पुरवली. “आणि हे सगळे शब्द स्त्रीलिंगी, पुल्लिंगी की नपुंसकलिंगी आहेत?”

“ती माती, ती आरती, ती नदी, ती माहिती – म्हणजे हे सगळे शब्द स्त्रीलिंगी आहेत.”

“हा.. आता आपण आपल्या नियमाकडे जाऊया. मला सांगा..” आजोबांनी पुढे सुरुवात केली, “स्त्रीलिंगी ईकारान्त शब्दांचे अनेकवचन होताना..”

“काही शब्दांना ‘या’ प्रत्यय लागतो??”..

“अगदी बरोबर. आणि याच नियमाचा पुढचा भाग – स्त्रीलिंगी ईकारान्त शब्दांचे अनेकवचन होताना काही शब्दांना..”

‘या’ लागत नाही...”

‘एवढा सगळा विचार असतो म्हणजे नियम ठरवताना !?’ दोघांचेही डोळे मोठे झाले.

“हो, अर्थात. पण... पण आपल्या मातृभाषेचे नियम आपल्याला माहीत नसले तरी आपण ती भाषा सहज बोलू शकतो, आहे की नाही मज्जा?”

“आता पुढची कृती करायला घ्या – आपला नियम तपासून बघण्यासाठी.. स्वराली तू असे

स्त्रीलिंगी ईकारान्त शब्द शोधून काढ, जे अनेकवचन होताना बदलत नाहीत. आणि स्वराज तू – ? "

"जे शब्द बदलतात.."

"अगदी बरोबर, पण शब्द मात्र स्त्रीलिंगी ईकारान्तच हवेत हं. किती शोधशील स्वराज? ५०–१००–२००?"

स्वराली आणि स्वराज तर शब्द शोधायच्या मागे लागले आहेत. चला तर स्वराली–स्वराजच्या वहीत डोकावूया.. ते कशा नोंदी करतायत ते पाहूया...

**स्वराजच्या नोंदी –**

| **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|
| ती पिशवी – | त्या पिशव्या |
| ती वही – | त्या वह्या |
| ती ताटली – | त्या ताटल्या |
| ती बाटली – | त्या बाटल्या |
| ती उशी – | त्या उश्या |
| ती बशी – | त्या बश्या |
| ती मावशी – | त्या मावश्या |
| ती कात्री – | त्या कात्र्या |

**स्वरालीच्या नोंदी –**

| **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|
| ती संस्कृती | त्या संस्कृती |
| ती मूर्ती | त्या मूर्ती |
| ती स्फूर्ती | त्या स्फूर्ती |

तुम्हीही घेताय ना यादी करायला? तुम्हांला दिसणारे, आठवणारे स्त्रीलिंगी ईकारान्त शब्द तुमच्या वहीत नोंदवा बरं का! आणि हो! शब्दांनी शंभरी गाठली की मला पाठवायला विसरू नका हं!"

**संपर्क : ९४२२७८८०८५**

**१) स्वराली–स्वराज स्त्रीलिंगी ईकारान्त शब्दांच्या अनेकवचनाचा नियम करण्याच्या खटपटीत आहेत. पण असे काही नियम असतात का?**

**२) तुम्हांला काय वाटतं, कुणाचे शब्द जास्त होतील?**

**३) ज्याचे शब्द जास्त तो नियम होईल आणि ज्याचे शब्द कमी ते शब्द नियमाला 'अपवाद' असतील. बरोबर ना?**

**४) स्त्रीलिंगी अकारान्त (अ या स्वराने शेवट होणाऱ्या) शब्दांच्या अनेकवचनाचाही असा नियम असेल का, किंवा नसला तर तयार करता येईल का?**

**५) स्त्रीलिंगीप्रमाणे पुल्लिंगी, नपुंसकलिंगी शब्दांचा एक नियम असेल की अनेक? किती असतील?**

प्रदीप निफाडकर

# परिंदे की फ़रियाद



मुलांनो, 'सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्ताँ हमारा' हे गीत लिहिणाऱ्या कवी अल्लामा मोहम्मद इक़बाल (जन्म ९ नोव्हेंबर १८७७–मृत्यू २१ एप्रिल १९३८) यांनी तुमच्यासाठीही खूप गाणी लिहून ठेवली आहेत. आपण त्यातील एक कविता ऐकू, जिचे शीर्षक आहे, 'परिंदे की फ़रियाद' म्हणजे पक्षाची तक्रार. ती वाचून तुम्ही कधीच कोणत्याही पक्ष्याला पिंजऱ्यात कोंडून ठेवणार नाही.

**आता है याद मुझ को गुज़रा हुआ ज़माना**
**वो बाग़ की बहारें वो सब का चहचहाना**

(मी जेव्हा स्वतंत्र होतो तेव्हाचा काळ मला आठवतो. ती बाग आठवते. जिथे मी खेळत होतो. माझ्या भावंडांचा किलबिलाटही आठवतो.)

**आज़ादियाँ कहाँ वो अब अपने घोंसले की**
**अपनी ख़ुशी से आना अपनी ख़ुशी से जाना**

(आपल्या घरट्यातील ते स्वातंत्र्य आता कुठे? आपल्या मनाने कधीही घरी या, कधीही जा असे आता कुठे करता येते.)

**लगती है चोट दिल पर आता है याद जिस दम**
**शबनम के आँसुओं पर कलियों का मुस्कुराना**

(दवबिंदूचे अश्रू आणि कळ्यांचे हसू जेव्हा जेव्हा मला आठवते, तेव्हा तेव्हा हृदयात कळ उठते.)

**वो प्यारी प्यारी सूरत वो कामनी सी मूरत**
**आबाद जिस के दम से था मेरा आशियाना**

(काय ते सुंदर सुंदर पक्ष्यांचे चेहरे, काय त्या सुंदर सुंदर मूर्ती बागेत होत्या. त्यांच्यामुळे माझे घरटे स्वतंत्र होते, सुंदर होते.)

**आती नहीं सदाएँ उस की मिरे क़फ़स में**
**होती मिरी रिहाई ऐ काश मेरे बस में**

(आता या पिंजऱ्यात मला ते आवाज येत नाहीत. उडून जाणे, जर माझ्या हातात असते तर, किती बरे झाले असते.)

**क्या बद-नसीब हूँ मैं घर को तरस रहा हूँ**
**साथी तो हैं वतन में मैं क़ैद में पड़ा हूँ**

(मी किती दुर्दैवी आहे, की जो स्वतःच्या घराला वंचित आहे. माझे सारे मित्र तर बागेत आहेत आणि मी एकटाच इथे पिंजऱ्यात पडलो आहे.)

**आई बहार कलियाँ फूलों की हंस रही हैं**
**मैं इस अँधेरे घर में क़िस्मत को रो रहा हूँ**

(पहा, वसंत ऋतू आला आहे आणि फुलांच्या कळ्या कशा हसत आहेत. आणि मी? मी इथे अंधाऱ्या घरात नशिबावर रडत आहे.)

**इस क़ैद का इलाही दुखड़ा किसे सुनाऊँ**
**डर है यहीं क़फ़स में मैं ग़म से मर न जाऊँ**

(या कैदेची दुःखे कुणाला सांगू? भीती वाटते की मी या पिंजऱ्यातच मरून तर जाणार नाही ना?)

**जब से चमन छुटा है ये हाल हो गया है**
**दिल ग़म को खा रहा है ग़म दिल को खा रहा है**

(जेव्हापासून बागेतून या पिंजऱ्यात आलो आहे हेच रडगाणे गात आहे. हृदयाला दुःख खात आहे आणि दुःखाला हृदय खात आहे. दुसरे काही घडत नाही.)

**गाना इसे समझ कर ख़ुश हों न सुनने वाले**
**दुखते हुए दिलों की फ़रियाद ये सदा है**

(मी रडून गातो आहे त्याला तुम्ही मंजूळ गाणे समजू नका. ते ऐकून खूश होऊ नका. दुःखी हृदयाची ही फिर्याद, ही तक्रार आहे, हे गाणे नाही.)

**आज़ाद मुझ को कर दे ओ क़ैद करने वाले**
**मैं बे-ज़बाँ हूँ क़ैदी तू छोड़ कर दुआ ले!**

(हे मला पकडून ठेवणाऱ्या, मला मोकळे कर. बोलू शकत नाही असा मी एक कैदी आहे. तू मला मोकळं सोडून माझे आशीर्वाद घे.)

**संपर्क : ९९२२१२७४९२**

# कुतूहल

अमित डहाणे, ९४२१०५०३८८

'किशोर' मित्रांनो, 'किशोर' जानेवारी २०२४ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ फेब्रुवारी २०२४ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत.

**१) कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (Artificial Intelligence) सहाय्याने कोणत्या देशातील खाजगी कंपनीने मानवाऐवजी पहिला रोबो मुख्याधिकारी (COMPANY CEO) नियुक्त केला आहे?**

१) भारत २) अमेरिका ३) चीन ४) जपान

**२) 'ग्लोबल टीचर प्राइज २०२३' ने सन्मानित करण्यात आलेल्या सिस्टर झेफ या कोणत्या देशाच्या नागरिक आहेत?**

१) जर्मनी २) ब्रिटन ३) मंगोलिया ४) पाकिस्तान

**३) हडप्पा संस्कृतीचे प्रथम अवशेष कोणत्या नदीच्या काठी सापडले होते?**

१) गंगा २) गोदावरी ३) रावी ४) सिंधू

**४) 'भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक' कोणास म्हटले जाते?**

१) डॉ.विक्रम साराभाई २) डॉ. होमी भाभा
३) डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम ४) राकेश शर्मा

**५) 'सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क' हा भारतीय राज्यघटनेतील कोणता हक्क आहे?**

१) मूलभूत कर्तव्य २) मूलभूत अधिकार
३) राजकीय अधिकार ४) वैयक्तिक अधिकार

**६) भारतीय चलनी नोटांवर किती भाषांमध्ये नोटेचे मूल्य लिहिलेले असते?**

१) ५ २) २२ ३) ११ ४) १५

**७) भोपाळ वायू दुर्घटनेवर कोणती वेब सिरीज प्रसिद्ध झाली आहे?**

१) द फॅमिली मॅन २) द कॉमन मॅन
३) द इंडियन मॅन ४) द रेल्वे मॅन

**८) २०२३ वर्षासाठीचा 'स्पोर्ट्स बिझनेस लीडर ऑफ द इयर' पुरस्कार कोणास मिळाला आहे?**

१) कपिल देव २) जय शहा
३) महेंद्र सिंग धोनी ४) विराट कोहली

**९) शरीरातील रक्त हे कोणत्या गटात मोडते?**

१) ऊती २) पेशी ३) विकर ४) अस्थी

**१०) 'के. के. बिर्ला फाऊंडेशन'चा ३३ वा व्यास सन्मान कोणास देण्यात आला आहे?**

१) पुष्पा भारती २) शांताराम चव्हाण
३) नितीन पवार ४) प्रा. शरद पगारे

**११) जगातील ८ वे आश्चर्य ठरलेले 'अंगकोर वाट' हे ठिकाण कोणत्या देशात आहे?**

१) भारत २) चीन ३) मलेशिया ४) कंबोडिया

**१२) आशियाई खेळामध्ये ५००० मीटर अंतर धावण्याच्या शर्यतीत पहिल्यांदा सुवर्ण पदक जिंकणाऱ्या महिला खेळाडू कोण?**

१) पी. टी. उषा २) पारुल चौधरी
३) कविता राऊत ४) अंजू दास

**१३) युनेस्कोच्या सांस्कृतिक यादीत अलीकडेच भारताच्या कोणत्या नृत्याचा समावेश करण्यात आला आहे?**

१) लावणी २) भरतनाट्यम्
३) कुचीपुडी ४) गरबा

**१४) नुकतेच महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यातील ज्वारीला भौगोलिक मानांकन (GI) मिळाले आहे?**

१) सोलापूर २) कोल्हापूर
३) जालना ४) अकोला

**१५) सियाचीन या जगातील सर्वात उंच युद्धभूमीवर तैनात होणाऱ्या भारतीय लष्कराच्या पहिल्या महिला वैद्यकीय अधिकारी कोण आहेत?**

१) कॅप्टन गीतिका कौल    २) कॅप्टन गीता कुमारी
३) कॅप्टन नीता पाटील    ४) कॅप्टन श्रुती कौर



## चित्रकोडे
रचना - घनश्याम देशमुख

### चित्रकोडे जानेवारी २०२४ चे उत्तर




### कुतूहल जानेवारी २०२४ ची उत्तरे

| | | |
|---|---|---|
| १) ३ | ६) १ | ११) २ |
| २) ४ | ७) ३ | १२) २ |
| ३) ३ | ८) १ | १३) २ |
| ४) १ | ९) १ | १४) १ |
| ५) ३ | १०) १ | १५) ३ |

### कुतूहल डिसेंबर २०२३ यशस्वी स्पर्धक

- **सातारा–** कु. सुवीर फडे
- **बीड–** कु. साद शेख

### चित्रकोडे डिसेंबर २०२३ यशस्वी स्पर्धक

- **पुणे –** कु. गार्गी कोठारी, कु. अर्णवसिंग राजपूत, कु. कौस्तुभ कुलकर्णी
- **सातारा –** कु. सुवीर फडे, कु. सर्वेश दुबळे, कु. प्राजक्ता जाधव, कु. रुतीक निकाळजे, कु. अर्णव क्षीरसागर, कु. परी पवार, कु. अहरोन माने, कु. श्रेया जाधव, कु. आयुष जाधव, कु. श्रेयश कोंडे
- **सांगली –** कु. धृव खाडिलकर, कु. शांभवी कुलकर्णी, कु. सुमित घोडके
- **बुलढाणा –** कु. भावना अजने, कु. सृष्टी चिंचोलकर, कु. श्रद्धा उन्हाळे, कु. आराध्या सांगोळे
- **बीड –** कु. यश सानप, कु. सिद्धांत दुधाळ, कु. अपूर्वा मडूर, कु. श्रेयश देवकर, कु. प्रिन्स बडे, कु. श्रेयश गायकवाड, कु. संस्कार दुधाळ, कु. समीक्षा देवकर, कु. सार्थक तांदळे, कु. अश्विनी शेळके, कु. निकीता दुधाळ, कु. श्रावणी दुधाळ, कु. प्रथमेश मोहिते, कु. तनुष्का तरटे, कु. साद शेख, कु. राधिका बनसोडे, कु. समृद्धी बोडखे, कु. सिद्धी गायकवाड, कु. तनवी गुंड, कु. शौर्य तरटे, कु. समर्थ राजपूरे, कु. श्रेया गुंड, कु. विश्वास लोखंडे, कु. कृष्णा लोखंडे, कु. ईबाद सय्यद, कु. ओंकार सोनटक्के, कु. प्रिया शिंदे
- **छ. संभाजीनगर –** कु. अर्जुन चुंगडे
- **अहमदनगर –** कु. विनया भालेराव
- **बेळगाव –** कु. प्राजक्ता नेसरकर, कु. गायत्री चौगुले, कु. स्नेहल कोवाडकर, कु. लता कोवाडकर, कु. अर्जुन पाटील
- **नंदुरबार –** कु. संगिता वळवी
- **नाशिक –** कु. अन्वित कडनोर
- **रत्नागिरी –** कु. सुमुख केतकर
- **कोल्हापूर –** कु. आर्या बामने, कु. प्रियांका पाटील, कु. सक्षम पाटील
- **वाशिम –** कु. स्वराली पवार
- **सिंधुदुर्ग –** कु. धनश्री धुरी

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/– चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.



आज आमच्या शाळेला सुट्टी होती, मग मी आणि माझे बाबा बाहेर फिरायला गेलो होतो. तेथे मला एक पाय नसलेली अपंग व्यक्ती दिसली, मग मी बाबांना सांगितले. मग मी साठवलेल्या पैशांतून त्यांना मी मदत केली व थोड्या पैशांनी तिच्या बाळाला खायला घेऊन दिले. मग तिलाही आनंद वाटला. मला आणि माझ्या बाबांनाही आनंद वाटला. मग आम्ही दोघेही आनंदी घरला गेलो. आई खीर बनवत होती, मग आईच्या लक्षात आले की घरात साखर संपलेली आहे. मग बाबांकडून १०० रु. घेतले व दुकानाला गेले. दुकानात गेल्यावर मी दुकानदाराला विचारले की १ किलो साखर किती रुपये. मग त्याने सांगितले ४० रु. मग मी एक किलो साखर घेतली व त्याने मला ६० रु. परत दिले, मग मी घरी जाताना एका माणसाला बघितले तो सगळ्यांना मदत मागत होता मग मला खूप वाईट वाटलं मग मी त्या माणसाला माझ्याकडेचे थोडे पैसे दिले. मग तोही आनंदी झाला व मीही आनंदाने घरी गेले. घरी गेल्यानंतर मी आई व बाबांना सांगितले तर मला दोघांनीही शाबासकी दिली. मग आम्ही सगळी जण आनंदात जेवलो. जेव्हा मी शाळेत शिक्षकांना हे सर्व सांगितले तेव्हा त्यांनी देखील शाबासकी दिली. मला ह्या घटनेवरून हे लक्षात आले की कोणतीही गरज फक्त आपल्यासाठी नसते. गरज ही दुसऱ्यांना पण असते.

**कु. रेश्मा सलीम पठाण,** इयत्ता ६ वी, जि. प. प्रा. शाळा कोल्हापूर,
मु. पो. पाचगाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर ४१६०१३



रविवारचा दिवस होता. आम्ही मित्र शाळेच्या मैदानावर क्रिकेट खेळत होतो. डाव चांगला रंगात आलेला होता. अचानक पाऊस सुरू झाला. त्यामुळे आम्ही काहीसे ओले झालो. मित्रांपैकी एका मित्राच्या घरचे गावाला गेले होते. तो एकटाच होता. तोपण खूप भिजला होता. तो नाही म्हणत असताना सुद्धा मी त्याला माझ्या घरून आपले टॉवेल वगैरे देऊन त्याला माझे कपडे घालायला दिले व ओले कपडे धुवायला टाकून दिले. नंतर त्याला आईकडून गरम दूध दिले. त्याला खूप बरे वाटले. नंतर त्याच्या घरी जाण्याअगोदर थोडे जेवणही दिले. दुसऱ्या दिवशी त्याचे आईवडील गावाहून आल्यावर त्यांना कळले, त्यांनी मला खूप शाबासकी दिली व माझ्या आईच्या डोळ्यांत तर पाणीच आले. गहिवरल्यामुळे तिला खूप आनंद झाला होता. सर्वांनी माझे कौतुक केले. संकटकाळी जो मित्र मदत करतो, सहकार्य करतो तो खरा मित्र! वर्गात सरांनी दिलेल्या या शिकवणीमुळे मला तो दिवस सार्थक झाल्यासारखे वाटले.

**कु. रोहन राजेश जैन,** प्रोफेसर कॉलनी,
"ब्रम्हा हाईटस" अपार्टमेंट समोर, भुसावळ, जि.जळगाव ४२५२०१



माझे नाव अश्विनी. मी इयत्ता नववीमध्ये शिकते. रविवार असल्यामुळे मी माझ्या काकूच्या घराकडे जात असताना मला माझी मैत्रीण ईश्वरी भेटली. ती मला म्हणाली की, “तुझ्या जवळ पैसे आहेत का?” मी तिला विचारले ‘तुला पैसे कशासाठी हवे आहेत.’ मग ती रडत म्हणाली, “अगं माझ्या आईची तब्येत खूप खराब आहे. आणि माझ्या जवळ पैसे नाही आहेत. मग मी आईला दवाखान्यात कशी घेऊन जाऊ. माझे बाबा तर आम्हांला सोडून गेले.” मग सर्व ऐकून माझ्या डोळ्यांत अश्रू आले. मी कोणताच विचार न करता पळत घराकडे जाऊन मला मावशीने खाऊसाठी दिलेले पैसे मी तिला देऊन टाकले. तिच्या आईला घेऊन आमच्या गावातल्या दवाखान्यात गेले. तिच्या आईला सलाईन व गोळ्या घेऊन दिल्या तिच्या आईला घरी आणले. तिची आई थोडी बरी झाली. ईश्वरीला आणि मला खूप आनंद झाला. सर्व माझ्या घरच्यांना सांगितले. त्यांनी माझे कौतुक केले आणि मला शाबासकी दिली.

**कु. अश्विनी युवराज खंडेराव**

इयत्ता ९ वी, संत गाडगे महाराज विद्यालय,
खंडाळा, ता. तेल्हारा, जि. अकोला ४४४१०३



माझ्या शाळेचे नाव, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुठा, माझ्या शाळेत गुलाब नावाची माझी मैत्रीण येते. ती अगोदर अबोल होती, आमच्याशी खेळत नव्हती, एकटे राहायची! पण नंतर मी तिला माझ्या शेजारी बसवून तिला शिकवू लागले. मग ती आमच्याशी बोलू लागली. मागच्या वर्षी दिवाळीत आम्ही म्हणजे मी तिला छान कपडे दिले, गोड गोड खाऊ दिला. तिचा चेहरा आनंदाने फुलला. त्यानंतर ती वर्गातील सर्वांसोबत बोलू लागली. आता पण ती माझ्या बाकावर बसते. माझ्याशी गोड गोड बोलते. कधी कधी मी तिच्या घरी जाऊन तिच्याशी बोलते. तीपण मला घरी बोलावते, कधी कधी मला गजरा देतो. ती मला खूप आवडते.

**कु. श्रुतिका संतोष घिवारे**

इयत्ता ४ थी, जि.प.प्रा शाळा मुठा,
पिरंगुट, ता. मुळशी,
जि, पुणे ४१२११५



माझे नाव स्वरूप मुरलीधर गरुड. इयत्ता तिसरीमध्ये शिकतोय. माझे वर्ग शिक्षक श्री चौरे सर आम्हांला आईच्या महतीविषयी नेहमी सांगत असतात. तीच संकल्पना मनात ठेवून माझी आई दरवर्षी माझा व दिदीचा वाढदिवस न चुकता साजरा करते. आम्हांला खूप आनंद होतो. परंतु ह्या वर्षी मात्र मी व दिदीने असे ठरविले की आईचा वाढदिवस साजरा करायचा. आम्ही साठवलेल्या पैशांतून आईसाठी एक छानसा ड्रेस व टॉप घेतला. हे पाहून आईला खूप खूप आनंद झाला. अक्षरश: डोळ्यांतून अश्रू आले. हीच गोष्ट आम्ही आमच्या सरांना सांगितले तेव्हा सरांनी आमचे कौतुक केले.

**कु. स्वरूप मुरलीधर गरूड**

इ. ३ री, जि.प.प्रा. शाळा, पिंपळद, ता. जि. नाशिक ८२२०९०



## राजा माझा शिवछत्रपती

युगे युगे ज्यांचे गुण गाती,
राजा माझा शिवछत्रपती.
होता पुत्र जिजाऊचा,
आशीर्वाद भवानी देवीचा.
माझा राजा आहे महान,
साऱ्या जगाचा आहे अभिमान
एक केली त्यांनी आसमान धरती ॥१॥
आज्ञा होती जिजाऊची,
शपथ घेतली स्वराजाची.
केला त्यांनी दुष्टांचा संहार,
नाही मानली कधी हार.
अखंड महाराष्ट्राचा अधिपती ॥२॥
शिवबा आहे महाराष्ट्राची शान,
आमचा आहे ती अभिमान.
आहे तो जनतेचा राजा,
शिवछत्रपती माझा.
केल्या त्यांनी एक अठरा पगड जाती ॥३॥
घेऊनी भवानी तलवार हाती,
लढले स्वराज्यासाठी.
त्यांच्यामुळे आली आनंदाची भरती,
देशभरात त्यांची गाणी गाती.
साऱ्या जगाचा आहे भूपती ॥४॥

**समृद्धी संतोष शिंदे,**
इयत्ता ६वी, जि.प. सेमी इंग्रजी प्राथमिक शाळा, हिवरखेडे, ता. चांदवड,
जि. नाशिक ४२३१०१

## माझी शाळा

विद्येचे मंदिर शाळा
ज्ञानाचे भंडार शाळा
मानवाचा अलंकार शाळा
विज्ञानाचा कळस शाळा
मातेचे वरदान शाळा
मराठीची आस शाळा
प्रगतीची ओढ शाळा
जीवनाचा आकार शाळा
मानवाचा आधार शाळा
माणुसकीचा मंत्र शाळा
अशी ही माझी प्रिय शाळा

**कु. रिद्धी दामोदर नारकर**
इयत्ता ८ वी
मु. पो. सौंदळ, ता. राजापूर,
जि. रत्नागिरी ४१६७०४

## पुस्तक

पुस्तकापासून शाळा होते सुरू
पुस्तकच आपले आहेत गुरू

पुस्तक आहे महत्वाचे छान
पुस्तकातच आहे खरे ज्ञान

पुस्तकात असतात निसर्गाच्या गोष्टी
गोष्टी वाचल्यामुळेच कळते सृष्टी

पुस्तकात असतात रंगीत चित्र
पुस्तकं आहेत आपले मित्र

पुस्तक आहे खूप महत्वाचे
पुस्तकात मार्ग आहेत जीवनाचे

**अमृता शहाजी करवर**
इयत्ता ८ वी, जि. प. प्रा. शाळा, राघुची वाडी
तालुका व जिल्हा- धाराशिव ४१३५०१



**कु. कविता भागिनाथ खांडेकर**
इयत्ता ६ वी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हंडाळवाडी
ता.पाथर्डी, जि.अहमदनगर ४१४१०२



**कु. शौर्य गिरमलेश्वर काळे**
इयत्ता ६ वी, नागनाथ विद्यालय, मोहोळ,
ता. मोहोळ, जि. सोलापूर ४१३२१३



**कु. गायत्री किशोर हासे**
जि. प. प्रा. केंद्र शाळा, राजापूर,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर ४२२६०५



**कु. विनय प्रकाश कांबळे**
जि. प. पूर्व प्राथमिक शाळा, सरमळे देऊळ,
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग ४१६५११






घनश्याम देशमुख
संपर्क : ९८२३४१३६२९
















त्या ऐवजी तसेच खोटे दागिने आणि इतर वस्तू आम्ही तुला देऊ, ते तू त्या ठिकाणी ठेव कुणाला काहीही कळणार नाही.
खोट्या वस्तूंचं पोतं घेऊन त्याचा माणूस आला तेव्हा आम्ही त्याचा पाठलाग केला.
आणि तुम्ही इथं पोहोचला. मला बांधण्यासाठी यांनी तुझ्या गाईच्या गळ्यातली दोरी घेतली.
थोड्याच वेळात गण्या आणि दगडूला शोधत ४-५ गावकरी जंगलामध्ये आले.
दगडू, अरे रात्र व्हायला आली... चला घरी.
दगडूने गावकऱ्यांना सर्व गोष्ट सांगीतली...
अस्सं होय! धरा रे यांना अन् चला गावाकडं...
गावकऱ्यांनी सर्व चोरांना गावात आणले व पोलिसांच्या ताब्यात दिले. सोमेश्वर मंदिरातील चोरी उघडकीस आणल्याबद्दल दगडू आणि गण्याचा सत्कार केला.
क्रमशः



# कामसू परी!

■ शशिकांत काळे

रानातल्या परीला काम फार असते
ससे हरिणांबरोबर खेळायचे असते
चुकलेल्या मुलांना घरी न्यायचे असते
राक्षसांपासून त्यांना वाचवायचे असते

बागेतल्या परीला काम फार असते
फळाफुलपाखरांना रंगवायचे असते
पहाटे पूर्वी फुलांना फुलवायचे असते
मध खाऊन दंव पिऊन फुलांत
झोपायचे असते

स्वप्नातल्या परीला काम फार असते
मुलांच्या स्वप्नांत रोजच जायचे असते
जादूच्या काठीने लढायचे असते
राजकन्येला जिंकून आणायचे असते

सगळ्याच पऱ्यांना काम फार असते
तुमच्या आमच्या सारखी त्यांना कधी
सुट्टीच नसते

संपर्क : ९९७५२४४४६७



इंग्रजी विभाग

# The Nature

Ananya Mahamuni

Nature is the gift,
given by Almighty God.
I love this gift,
and am grateful to my Lord.

Birds are flying in great joy,
trees are growing to touch the sky.
Flowers are nourishing the honey bee,
rivers are flowing to meet the sea.

Nature gives abundant air,
polluting that, is not fair.
Nature gives abundant wood,
cutting that, is not always good.

Let's protect endangered wildlife,
give it a new lease of life.
Animals' thriving is a must
remember, we all can co-exist.

By building concrete jungle,
man's eyes shine with a twinkle.
But in the name of progress,
respect the nature and don't digress.

**Contact : 9850110805**

*Atul Shirude.*

# Memorable time....



Once upon a time in New Zealand, there was a small village -Sasika. Sasika was a small and beautiful village. It was near about 30 Kms. away from the city nearby.

A little boy Gary lived with his family in that village. Gary was 6 years old and studying in the second grade in a Government school. He was adventurous and loved going through small exciting events in school as well as at home.

Gary had a number of friends. Peter, John, Hansy, Mary and Maria were his best friends. All of them lived a call away from each other. They were always together. They went to school together, studied together. All of them were good in studies and secured top ranks in their academic examinations.

After final examination, they all had holidays for an entire month. On their way back home, they planned to spend forthcoming holidays together with extreme joy and spent a whole day at a different friend's house daily. Gary's house was decided to be the first meeting place of their enjoyment plan !

As per their plan they all gathered at 10 o'clock at Gary's house and started playing different indoor as well as outdoor games. They shared stories, organized competitions related to sports as well as General Knowledge. The holidays seemed to pass smoothly . All of them had been enjoying.

One sunny afternoon, all were at Gary's house. Suddenly the climate started changing. It grew cloudy within a few minutes. There was darkness all around. .Soon it started raining. Initially there was a slight drizzle. All the friends rushed out and started dancing happily. Gary's mother saw them enjoying and smiled to herself. After half an hour, she called them inside as she feared that they could catch a cold. Barely had the children entered the house, Gary yelled "Hey look, there are hailstones along with the rain!!

All the children rushed out to collect the lovely pearls falling from the sky.

Gary was all excited. He looked at his mother. She was standing at the door with some bowls in her hand. "Yeah!!" shouted Harry. He ran to her and thanked his mom for her thoughtfulness. He distributed the bowls. All the friends started collecting the those shining white ice pieces in their bowls. What fun they had!! They had never seen ice pieces fall along with the rain. It was a new experience for all the children. They sat in the portico all drenched and enjoyed having the hail stones. They sang some songs and danced joyfully.

Gary's mother offered them napkins to wipe their bodies. She offered them some yummy soup. The children enjoyed the soup and thanked Gary's mother for the delicious soup. They all dispersed and walked back to their respective homes with fond memories of the great new experience with the hailstones. What a Memorable time they all had!!

**Contact : 9665033908**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Complete the second face as per first one and colour both the faces.**






**Which shadow is the true one of the original at the centre.**



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ फेब्रुवारी २०२४.

३) कोड्याचे उत्तर मार्च २०२४ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2024-2026 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.1.2024 Posting on 27th & 28th January 2024
License to Post without prepayment of postage No. WPP-53

किशोर किशोर

# किशोरची वर्गणी भरा आता ऑनलाईन!

## वार्षिक वर्गणी ८० रुपये (दिवाळी अंकासह)

पुढील वेबसाईटला भेट द्या. www.kishor.ebalbharati.in

किशोर: ज्ञान आणि मनोरंजनाचा अद्‌भुत खजिना

बालभारतीचे प्रकाशन

महाराष्ट्रातील मुलांचे सर्वांत लाडके मासिक

५३ वर्षांची अविरत परंपरा



संपर्क : ०२०-२५७१६२४४

ऑनलाईन वर्गणीकरिता क्यूआर कोड स्कॅन करा

**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,